म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. १२५८

...आपल्ला

# देशसंरक्षणाचा अमोघ मार्ग

● संग्राहक
तिम्माप्पा नायक

● अनुवादक
पुंडलीकजी कातगडे

REFBK-0014482

...ाम सेवा समिति, हुदली

किंमत एक रुपया

अनुक्रम 3CCAL... वि: चरित्र
क्रमांक 12440 नोंद दि: 13/71/20

# गांधीजींनी दाखविलेला देशसंरक्षणाचा अमोघ मार्ग

१ ४४८२

संग्राहक : तिम्माप्पा नायक
अनुवादक : पुंडलीकजी कातगडे
प्रस्तावना : वल्लभस्वामी

REFBK-0014482

ग्राम सेवा समिति, हुदली

किंमत एक रुपया

प्रथमावृत्ति

प्रकाशक :

**पुंडलीकजी कातगडे**

ग्रामसेवा समिती, हुदली

मुद्रक :

**ह. म. गद्रे**

जनवाणी प्रिंटिंग प्रेस

४५ बुधवार, पुणें

# प्रस्तावना

मन म्हणजे मनन करणे या धातूच्या अर्थानुसार मनुष्य म्हणजे एक मनन करणारा प्राणी. विचार करण्याच्या अशा शक्तीचा उपयोग करून जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये त्याने अद्भुत प्रगती करून घेतलेली आहे. त्या योगे जीवन उन्नत व सुखमयही झालेले आहे. तथापि स्वतःच्या रक्षणासाठी विचार करताकरता, अॅटमबॉंब व त्याच्यापेक्षा भयानक शस्त्रापर्यंत तो येऊन पोचला आहे. त्यामुळे संरक्षणाला काही अर्थच शिल्लक राहिलेला नाही अशा स्थितीपर्यंत तो येऊन पोचला आहे. भस्मासुराप्रमाणे ही शस्त्रे, ती वापरणाऱ्यांचाही नाश करतात. संरक्षणाच्या दृष्टीने पाहिल्यास, हिंसक साधने व्यर्थ होत ही गोष्ट अणुशस्त्रास्त्रांनी स्पष्ट करून ठेविली आहे. कोणीही ही गोष्ट नाकबूल करणार नाही. हिंसक शस्त्रांचा आधार सोडण्याचे धैर्य मनुष्य अजूनही करीत नाही. त्याला कारण परंपरा !

बाह्य उपकरणांनी आपल्या संरक्षणाचा प्रयत्न करण्यापेक्षा 'अंतःकरण' साधनानेच संरक्षण करून घेतले पाहिजे. त्यापासूनच आपले खरेखुरे रक्षण होऊ शकेल. हा विचार मनुष्यापुढे अगदी आरंभापासूनच आहे. काही मनीषी लोकांनी या विचाराला आचारात आणून त्याचा विकास करून घेतलेला आहे. आम्हांला माहीत असलेल्या इतिहासात या विचाराचा आद्य प्रतिपादक भगवान बुद्ध होय, असे समजतात. आधुनिक काळात गांधीजींनी त्याचा सामूहिक आचार किंवा प्रयोग करण्याची रीती समजून सांगून स्वराज्यप्राप्तीसाठी त्याचा उपयोग करून दाखविला.

त्यांचा हा प्रयोग त्या काळच्या राज्यसत्तेच्या विरुद्ध करण्यात आला होता. तथापि आक्रमण करणाऱ्या सत्तेविरुद्ध अहिंसक प्रतिकार कसा करावा याचा प्रयोग करून दाखविण्यास गांधींना अवकाश मिळाला नाही. परंतु महायुद्धाच्या काळात जपानी आक्रमणाची भीति उत्पन्न झाल्या वेळी या विचारांविषयी थोडेबहुत चिंतन-लेखन चालू होतेच. हा प्रश्न चिनी आक्रमणाने अधिक तीव्रपणे लोकांपुढे आला. याचे थोडेसे चिंतनही चालू झाले होते; तथापि अधिक चिंतन व अनुभव याची नितान्त आवश्यकता आहे.

श्री. तिम्माप्पा नायकांनी या लहानशा पुस्तकात संग्रहित केलेले लेख अशा चिंतनाला सहायक होतील एवढेच नव्हे तर अहिंसेविषयीची श्रद्धा स्थिर करण्यास, वृद्धिंगत करण्यास सहाय्यभूत होतील. गीतेमध्ये सांगितल्याप्रमाणे ज्याची जशी श्रद्धा असेल तसा तो होईल. ' यो यः श्रद्धः स एव सः ' हे छोटेसे पुस्तक आपण वाचू या. त्यावर विचार करू या. मानवजातीला अहिंसे-शिवाय प्रगतीचा दुसरा मार्गच नाही अशी श्रद्धा दृढ करून घेऊ या.

**नाऽन्यः पंथा विद्यते अयनाय**

बेंगलोर
ता. २५-७-६४

वल्लभस्वामी

३८८८८ चार
९२५८ नों. दि. ९।३।

# लेखकाचा अल्प परिचय

गांधीजींच्या शिकवणीचे व नेतृत्वाचे अनेक पैलू होते, आणि त्यांचा विशिष्ट विचार किंवा विशिष्ट कार्यक्रम उचलणारे त्यांना लक्षावधी सहकारी किंवा अनुयायी लाभले होते. राजकारणातील अनुयायी बहुधा त्यांना सर्वांत अधिक लाभले असतील, तर अनेकांना त्यांचे राजकारण पटत-झेपत नसले तरी त्यांची खादी मनापासून आवडली. काहींचा ग्रामोद्योगावर भर असे, काहींना राष्ट्रभाषा तर काहींना हरिजन सेवा विशेष आकर्षक वाटली. ज्यांना गांधींची कोणतीच गोष्ट आवडणारी नव्हती अशा त्यांच्या प्रतिपक्षावर—दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्या सत्ताधीशांवरही त्यांच्या सत्य-निष्ठेचा प्रभाव पडल्याशिवाय राहिला नाही.

तथापि गांधीजींची समग्र जीवनदृष्टी किंवा तत्त्वज्ञान, गांधीजींची सेवापरायणता, व त्यांचा समग्र कार्यक्रम ज्यांनी नीट पारखून समजून घेतला, त्याचे भक्तिभावाने ग्रहण केले आणि स्वतःच्या जीवनात प्रत्यही व अखंड आचरिला, असे अंतर्बाह्य गांधीमय बनलेले पुरुष विरळा. अशापैकीच या पुस्तकाचे मूळ कानडी लेखक श्री. तिम्माप्पा नायक हे आहेत.

महाराष्ट्राला त्यांचा विशेष परिचय नाही. आज ते पासष्ट वर्षांहून अधिक वयाचे आहेत. महाविद्यालयीन शिक्षण आटोपून ते सरळ गांधीजीं-कडेच वळले व तेव्हापासून गेली ४०–४२ वर्षे अखंड देशसेवाच करीत आहेत. काही काळ स्व. गंगाधरराव देशपांडे यांच्या हुदली (जि. बेळगांव) येथील आश्रमांत व खुद्द गांधीजींच्या साबरमतीच्या सत्याग्रहा-श्रमामध्ये राहून त्यांनी स्वतःची जन्मभूमि कारवार जिल्हा (उत्तर कानडा जिल्हा) हीच आपली कर्मभूमि केली. ते सहज ब्रह्मचारी आहेत. त्यांचा वेश व राहाणी यावरून ते पदवीधर असल्याची कोणाला शंका येणार नाही. खादी, ग्रामोद्योग, सत्याग्रह, करबंदी, हरिजन सेवा, राष्ट्रभाषा प्रचार, स्त्री-शक्ती विकास, निसर्गोपचार —गांधीजींच्या हरेक कार्यात त्या त्या वेळी त्यानी हिरीरीने भाग घेतलेला आहे. १९३०–३२ च्या सत्याग्रह आंदोलनामध्यें कारवार जिल्ह्याने जंगल सत्याग्रह व करबंदी या बाबतीत केलेला त्याग व दाखविलेली धडाडी स्वातंत्र्यलढ्याच्या इति-

हासात अविस्मरणीय राहील आणि त्याच्या श्रेयाचा मोठा वाटा श्री. तिम्माप्पा नायक व त्यांचे समानशील सहकारी यांनाच द्यावा लागेल. स्वराज्यप्राप्तीनंतर मुंबई सरकारतर्फे सर्वोदय योजना सुरू करण्यात आली तेव्हा चारही कानडी जिल्ह्याचे व विशेषतः कारवार जिल्ह्याचे काम सरकारने तिम्माप्पावरच सोपविले, पण सरकारी तंत्रातून ते हळूहळू निवृत्त झाले. व विनोबाजींच्या भूदानकार्याला त्यांनी स्वतःला वाहून घेतले. तुरुंगवासामुळे किंवा नित्याच्याही कठोर रहाणीमुळे त्यांची प्रकृति अलीकडे खालवली आहे. तरी त्याही स्थितीत व उतारवयांतही आसाममध्ये भाषिक दंगे झाले तेव्हा शांतिसैनिक या नात्याने त्यांनी सात आठ महिने हरतऱ्हेच्या अडचणींना तोंड देत कार्य केले, व काम आटोपूनच ते परतले. अलीकडे धकाधकीची कामे झेपत नसल्याने, ते आपल्या मादनगेरी येथील सेवाकेंद्रांमध्ये एकाच जागी रहातात. परंतु तेथेही कर्मयोग सीमित असला तरी ज्ञानयोग विशेषच सक्रिय झालेला दिसतो. त्यांनी आपली स्वतःचीच दीर्घ आचरणाने व चिंतनाने परिपक्क बनलेली जीवनविषयक विचारसरणी " संताची उच्छिष्टें बोलतो उत्तरें " या संत पद्धतीनेच या पुस्तकात गांधीजींच्या नावाने मांडली आहेत. प्लेटोनेंसुद्धा असेच " सॉक्रेटिसाचे संवाद " लिहिले आणि व्यासांनी श्रीमद्‌भगवद्गीता लिहिली.

तिम्माप्पा नायकांना मराठी समजते पण सराव कानडीचा, म्हणून त्यांनी कानडी लिहिले व मराठी वाचकांना उपलब्ध करून देणारे दुसरे श्री. पुंडलीकजी कातगडे हे एक समर्थ कार्यकर्ते व समर्थ मराठी लेखक आहेत. तेही गांधीजींचे पट्टीचे सहकारी किंवा अनुयायी आहेत. तिम्माप्पांचे लोणी आणि त्याचे पुंडलीजींनी बनविलेले लोणकढे तूप मराठी वाचकांना रुचिकर, पुष्टिकर तुष्टिकर होवो.

बंगाली वाङ्मयाची मराठी भाषांतरे करण्याचा सांप्रदाय जुना आहे, पण दक्षिणी वाङ्मयातील निवडक रत्ने वेंचण्याचा प्रयत्न मराठी लेखकांनी केलेला विशेष जाणवत नाही. साधना प्रकाशनाने या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या निमिताने आपली आंतरभारती प्रवृती दक्षिणेकडे वळवली याबद्दल त्यांचेहि अभिनंदन.

थोडा आत्मप्रसिद्धीचा दोष पत्करूनही श्री. तिम्माप्पांबद्दलची माझी वैयक्तिक कृतज्ञता येथे व्यक्त करून घेतो.

१९४४ साली मी हिंडलग्याच्या जेलमध्ये आमांशाने भयंकर आजारी पडलो तेव्हा तिम्माप्पांनी केलेली माझी सेवा मी कधीच विसरणार नाही. आम्ही दोघेही भूदान चळवळीत पुन्हा एकत्र आलो. कडोली येथील भूदान शिबिरात माझे भूदान विषयावर भाषण झाले, ते लिहून काढण्याची सूचना तिम्माप्पांनीच मला केली. त्यांच्या त्या प्रोत्साहनावरून मी माझे 'गावचे गोकुळ' लिहिले व त्याच्या चार आवृत्ती सुधारीत गेलों. लेखनाने विचार अधिकाधिक स्पष्ट व संपूर्ण बनत गेल्यानेच आज मी चलन-शुद्धीचा मुक्काम गांठू शकलो आहे.

मुंबई
ता. २१-२-६५

**आप्पा पटवर्धन**

38884 वि: चरित्र
क्रमांक 9256 नोंद दि: 93/9/64

# प्रकाशकाचे दोन शब्द

गांधीजींनी देशाच्या संरक्षणासाठी जो एक अमोघ मार्ग दाखविलेला आहे, त्याविषयी प्रसंगा-प्रसंगाने त्यांनी विशदीकरणही केले आहे. एखादा विषय घेऊन त्याचे शास्त्र व खंडन-मंडनात्म लेख, किंवा ग्रंथ लिहीत गांधीजी कधीच बसले नाहीत. त्यांच्या मनापुढे जे प्रसंग, ज्या समस्या उभ्या रहात किंवा त्यांना कोणी काही प्रश्न विचारीत, त्याच वेळी ते त्यांची उत्तरे देत गेले आहेत. आणि त्यातूनच एक शास्त्र व एक तत्त्वज्ञान निर्माण झालेले आहे. अशा त्यांच्या विस्कळित विचार-सागरातून आमचे स्नेही श्री. तिम्माप्पा नायक यांनी हा संग्रह निवडलेला आहे. गांधीजींची रहाणी-करणी-विचारसरणी आपल्या स्वतःच्या खाजगी व सार्वजनिक जीवनात व आचारात उतरविण्याचा ज्यांनी आपल्या जीवनभर सतत कसून प्रयत्न केला आहे, जागरूकता व्यक्त केली आहे, अशा महाभाग प्रयोगवीरांमध्ये श्री. तिम्माप्पा नायक यांचे स्थान पहिल्या पंक्तीमध्ये, किंवा श्रेष्ठ श्रेणीमध्ये गणिले गेले आहे यात शंका नाही. स्वतः गांधीजींनी आपल्या 'हरिजन' साप्ताहिकामध्ये एक स्वतंत्र लेखच श्री. तिम्माप्पा नायक यांच्या कार्याविषयी व सैद्धांतिक जीवनाविषयी पूर्वी लिहिलेला आहे. अशा एका क्रियावान् प्रयोगवीराने हे संकलन केलेले असल्यामुळे या संग्रहास विशेष महत्त्व आहे.

या पुस्तिकेत श्री. नायक यांचे असे काहीही नाही असे सकृत् दर्शनी दिसत असले तरी, श्री. नायक यांची संकलनाची तात्त्विक दृष्टि त्यात आहे, ही गोष्ट कोणासही प्रत्ययास आल्याशिवाय रहाणार नाही. या मूळ कन्नड पुस्तिकेला प्रस्तावना लिहिणारे श्री. वल्लभस्वामी यांनी सदर कानडी पुस्तिकेच्या प्रस्तावनेमध्ये, या संग्रहाचे रहस्य थोडक्यात दिलेले आहे. श्री. वल्लभस्वामी यांनी आपले बहुतेक जीवन भूदानयज्ञ-प्रणेते पू. विनोबाजी यांच्या सान्निध्यात जीवनसाधना करीत घालविले होते. त्यांच्याविषयी एवढे सांगितले म्हणजे त्यात सर्व काही आले !

या कन्नड पुस्तिकेचा हा मराठी अनुवाद मी आज आमच्या समितीच्या वतीने प्रकाशित करीत आहे. याचे कारण अगदीच उघड आहे. महात्म

गांधीजींचे विचार भारतातील आबालवृद्धांपुढे सतत रहावेत, त्यांचा विचार व्हावा, त्या दृष्टीने त्यांचे प्रयोग व्हावेत, आणि मगच त्यांची ग्राह्याग्राह्यता ठरावी असे मला वाटते. तसे पाहिले तर तत्त्वज्ञानाच्या प्रत्येक सिद्धांताला चर्चा-टीकेचे अग्निदिव्य रोजचेच असते व असावयास पाहिजे. तोच त्याचा मान, तोच त्याचा अधिकार, आणि तेच त्याचे खरे तकर्दार होय. ज्ञानाच्या किंवा तत्त्व–सिद्धांताच्या बाबतीत कोणतेही गृहीत कृत्य नाही. कोणत्याही तत्त्वज्ञानाच्या कोणत्याही पायाभूत सिद्धांताविषयी कोणीही अधिकारी विचारक शंका घेऊ शकतो, आणि त्याला आधार कोणता अशी त्याची चौकशी करू शकतो.

या संग्रहातील लेखांच्या प्रकरणांचा जो अनुक्रम आहे, तो क्रमशः अभ्यासला तर एका शास्त्राच्या भिन्नभिन्न पायऱ्यांची अनुक्रमे मांडणी केली आहे, असे वाटण्याइतका तो अनुक्रम यथास्थित झालेला आहे, असे दिसून येईल. ही मांडणी करण्याची आगाऊ तशी कोणतीही योजना नसताना ते जुळून आले आहे इतकेच. या विषयाचे म्हणजे देशरक्षणार्थ गांधीजींनी दाखविलेल्या तिसऱ्या मार्गाचे सम्यक् ज्ञान करून घेण्यास, ही पुस्तिका उपयोगी होईल असे आमच्या समितीस वाटल्यामुळे, आम्ही ती प्रकाशित करीत आहोत.

या मार्गावर श्रद्धा ठेवणाऱ्यांना आपली श्रद्धा अधिक दृढ करून घेण्यास आणि श्रद्धा नसणाऱ्यांमध्ये ती उत्पन्न करून घेण्यास या पुस्तिकेचा खात्रीने उपयोग होईल असा आम्हांला विश्वास वाटतो.

आपला सेवक

**पुंडलीकजी कातगडे**

अनुक्रमांक ... दि:
... नोंद दि:

# अनुक्रमणिका

१. आक्रमणाला तोंड देणारे अभिनव अस्त्र– गांधीजी
(अ) आत्मरक्षणाचे अमोघ साधन
(आ) अहिंसक प्रतिकाराचा आणखी एक अद्‌भुत मार्ग
(इ) निःशस्त्र प्रतिकाराचे रहस्य
(ई) अधिक क्षेमकर मार्ग
(उ) ही काही अशक्य गोष्ट नाही
(ऊ) व्यक्तीला जे साध्य झाले ते समूहाला असाध्य नाही
२. अहिंसात्मक प्रतिकार — गांधीजी
३. हिटलरसारख्या निर्दय सर्वाधिकाऱ्यापुढे अहिंसक प्रतिकार चालेल काय ?
(अ) एक ऐतिहासिक उदाहरण— रोमन नीरो
(आ) निर्भय अहिंसेने विषसर्पही प्रभावित होतो
४. अहिंसा मार्गच राष्ट्ररक्षणासाठी सर्वोत्कृष्ट व्यावहारिक मार्ग
(अ) सैन्यासाठी अपरिमित खर्च
(आ) यातून जागतिक युद्धही उत्पन्न होऊ शकेल
(इ) युद्धापासून सर्वनाश
(ई) गांधीजींचा मार्गच फलप्रद व परिणामकारक
(उ) युद्धाचे दुष्टचक्र
(ऊ) अहिंसेनेच शाश्वत परिहार
५. अहिंसा मार्गाने देशाचे रक्षण कसे होऊ शकेल ?—जयप्रकाश नारायण
(अ) सैन्याचे विसर्जन आणि सामाजिक परिवर्तन
(आ) अहिंसात्म असहकार–एक अस्त्र
(इ) शत्रुसैन्यामध्ये परिवर्तन
(ई) हिंसा हा एक नास्तिक वाद
(उ) सैन्याने रक्षण होणार नाही
(ऊ) चिन्यांच्या क्रांतिविचाराला आमचे उत्तर
(ए) अहिंसक क्रांतीपुढे हिंसक क्रांती निस्तेज वाटते
(ऐ) गांधीजींनी दिलेला इशारा

६. आक्रमणाला तोंड देण्याकरिता अहिंसक सिद्धता
(अ) अहिंसक आर्थिक पाया
(आ) अहिंसक राष्ट्राचा संकल्प
(इ) युद्धाची उत्पत्ति
(ई) अहिंसक राष्ट्राची मानसिक-नैतिक सिद्धता
(उ) अहिंसक प्रतिकाराचे तीन टप्पे.
(ऊ) आपण कोणती निवड केली पाहिजे ?
७. शांतिसेना व शांतिसैनिक – गांधीजींचे मार्गदर्शन
(अ) एक पाशवी शक्ती, दुसरी आत्मशक्ती
(आ) सक्रिय अहिंसेला कोणते गुण आवश्यक आहेत ?
(इ) शांतिसैनिकामध्ये प्रल्हादाची श्रद्धा असली पाहिजे
(ई) दुष्ट समजल्या जाणाऱ्यामध्येही आत्मा आहे
(उ) शांतिसेना नायकाची नीती
(ऊ) शांतिसेनेची शिस्त
(ए) अहिंसक संघटनेचे रहस्य
(ऐ) शांतिसैनिकाची मनोभावना कशी असली पाहिजे ?
(ओ) अहिंसा सेवेमध्येच परिणत झाली पाहिजे
(औ) वानराकडूनही देव कार्य साध्य करून घेतो
८. अहिंसाशक्तीवर आणखी प्रकाश : काही घटना
(अ) पशुजगतामधील एक घटना : दोन पक्षी आणि कुत्रा
(आ) काँग्रेस मंत्र्यांना गांधीजींची कानगोष्ट
९. अहिंसात्मक प्रतिकार हाच व्यवहार्य–मार्जरी साइक्स
१०. अण्वस्त्रे आणि अहिंसा
११. अहिंसात्मक प्रतिरोध–सेसिल-इ-हिवेस

---

# आक्रमणाला तोंड देणारे अभिनव अस्त्र

## गांधीजी

अमेरिकेतील एका मित्राने प्रश्न विचारला आहे:—

"भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारताने अहिंसा हीच आपली राष्ट्रीय नीति म्हणून स्वीकारली, असे समजा, तर अशा वेळी परराष्ट्राने भारतावर आक्रमण केल्यास तो आपले संरक्षण कसे करूं शकेल ? आक्रमकाचा प्रतिकार कोणत्या रीतीने करील ? भारताच्या सीमेवर चढाई करून आलेल्या सैन्यास कोणत्या कृतीने प्रतिकार करील ? आक्रमक अखिल भारत पादाक्रांत करीपर्यंत कोणत्याही प्रकारचा प्रतिकार न करता भारत स्वस्थ बसेल काय ? "

उत्तर :– अशा प्रसंगामध्ये भारत काय करू शकेल, ही केवळ तर्काचीच बाब आहे. तुमच्या प्रश्नामध्ये एक मोठेच 'तर' आहे. भारत आपल्या सर्व राष्ट्रीय व्यवहारात 'अहिंसा' नीतीचाच अंगीकार करील तर पुढे काय? असा आपला प्रश्न आहे. क्षणभर आपण तसेच मानून चालू या. भारताने अहिंसेला आपली राजकीय नीती म्हणून स्वीकारलेले आहे. सैन्य ठेविले नाही. कोणत्याही प्रकारचे शस्त्रास्त्र, दारुगोळा, टँक, युद्ध, विमान, वगैरे त्याच्याजवळ नाही. भारत एकाकी होऊन उभा आहे. अशा परिस्थितीत रोमन इतिहासामधील नीरोसारखा भयंकर आक्रमक पुष्कळ मोठे सैन्य घेऊन भारतावर हात उगारून आल्यास काय होईल ?

### आत्मरक्षणाचे अमोघ साधन

त्या प्रसंगी भारत खालीलप्रमाणे आत्मरक्षण करून घेऊ शकेल: चढाई करून येणाऱ्या सैन्याला कोणत्याही प्रकारचा विरोध न करता

आत येऊ देईल. परंतु त्याच वेळी त्या आक्रमकाला व त्याच्या सैनिकांना स्पष्ट शब्दांत सांगेल की, ‘ आपण या देशात हाती घेतलेल्या कोणत्याही कामात, आपल्या कोणत्याही व्यवहारात आम्ही आपल्याशी थोडा देखील सहकार करणार नाही. ’ कोणत्याही भीतीला, कोणत्याही शिक्षेला किंमत न देता तुमचे कोणतेही हुकूम आम्ही पाळणार किंवा मानणार नाही, असे निर्धारपूर्वक भारतीय जनता सांगेल. हाच सविनय असहकार, हाच भारताचा आत्मरक्षणाचा मार्ग.

तथापि आपण असे म्हणू शकाल की, हा क्रूर, पाषाणहृदयी आक्रमक अथवा चढाईखोर त्याचा केवळ उपहास करून मोकळा होईल. आधुनिक शस्त्रास्त्राने सज्ज होऊन अनेक राष्ट्रांना पादाक्रांत करणाराला आमच्या या निःशस्त्र सैन्याचा प्रतिकार करणे केवळ एक खेळ किंवा हातचा मळ आहे असे आपण म्हणाल. परंतु भारत कित्येक कोटींची जनसंख्या असलेले राष्ट्र. त्या सर्व जनतेने आपापली कामे बंद केल्यास अखिल देशभरात सर्व कारभार थंड पडेल. त्या वेळी आक्रमकाचेही कोणतेच चाळे चालणार नाहीत. असा देश ताब्यात राहिला तरी त्याचा उपयोग काय ?

सविनय असहकार एका अगाध शक्तीचे अमोघ अस्त्र आहे, असे चढाई करणाऱ्या आक्रमकाला थोड्याच वेळात दिसून येईल व पटेल.

## अहिंसक प्रतिकाराचा आणखी एक अद्‌भुत मार्ग

भारत आत्मरक्षणाचा आणखी एक उपाय हाती घेऊ शकेल. अहिंसक प्रतिकाराच्या कलेमध्ये तरबेज झालेले निःशस्त्र भारतीय लोक आक्रमकांच्या तोफांपुढे स्वतःची आहुती अर्पिण्यास छातीठोकपणे पुढे येतील. शरणागती-पेक्षा मरण कितीतरी पटीने चांगले आहे, अशी घोषणा ते करतील. अन्य देशांमध्ये अशा वीरवाणीची घोषणा झाल्याचे उदाहरण आहे. पण भारताच्या घोषणेमध्ये खरोखर संपूर्ण अर्थ सामावलेला आहे. कित्येक कोटी लोकांचा अदम्य निर्धार यामध्ये व्यक्त झालेला आहे. लाखो भारतीय आक्रमकांच्या तोफांना आहुती जाण्यास पुढे येणे हे एक रौद्र, भयंकर दृश्य होईल. जगाच्या इतिहासात अत्युच्च नैतिक अशी ही घटना होईल. त्या आत्मयज्ञात भाग घेणारे अत्युन्नत पदवीला जाऊन पोचतील.

## निःशस्त्र प्रतिकाराचे रहस्य

निरोसारख्या अत्यंत क्रूर आक्रमकालाही अंतःकरण खात्रीने असते असा प्रतिकाराच्या नीतीचा मूळ सिद्धांत आहे. कित्येक कोटी लोकांनी आपली अंगुली देखील न उगारता किंवा न उचलता तोफेच्या तोंडी जाण्याच्या निर्धाराने चालविलेल्या या लढ्याचे दृश्य चढाई करणारे असोत किंवा त्यांचे सैनिक असोत, यांनी पूर्वी कधीही पाहिलेले नाही. ही अपूर्व अद्‌भुत कृति नीरोसारख्यांवरही परिणाम केल्याशिवाय राहणार नाही. एखादे वेळी त्याच्यावर तसा परिणाम झाला नाही तरीही, त्याच्या सैनिकांच्यावर परिणाम होणारच होणार.

युद्धाच्या आवेशात एक दुसऱ्यांना ठार करीत वर्षानुवर्षे जाऊ शकतील. कारण मारले तरी पाहिजे किंवा मेले तरी पाहिजे हे दोन मार्ग त्यांच्या पुढे असतात. परंतु आपल्याला मारण्यासाठी पुढे न येता, निःशस्त्र होऊन प्रतिकार करणाऱ्यांना शेवटपर्यंत ठार करीतच राहणे कोणासही शक्य नाही. असे सैनिक किंवा आक्रमक आपल्या मनात लाजून किंवा किळस येऊन आपल्या हातांतील शस्त्रास्त्रे खाली ठेवतील. याप्रमाणे शेवटी सविनय असहकाराच्या अहिंसक प्रतिकाराच्या अभिनव शांति-अस्त्राने आक्रमकाचा पराभव झाल्याशिवाय राहणार नाही.

## अधिक क्षेमकर मार्ग

व्यावहारीक दृष्टीने विचार केला तरीही शस्त्रप्रतिकारामध्ये संभवणाऱ्या प्राणहानिपेक्षा अहिंसक प्रतिकारामध्ये संभवणारी प्राणहानि थोडी आहे. गेल्या महायुद्धात हॉलंड, बेल्जम, फ्रान्स आदि राष्ट्रांमध्ये लाखो लोक मेले नाहीत काय ? परंतु लाखो लोकांनी आक्रमकापुढे हातही न उगारता, त्यांच्या तोफांपुढे छातीठोकपणे उभे राहून विरोध केला असता तर इतक्या लाखो लोकांना ठार मारण्याच्या उसाभरीस ते कधीच पडले नसते.

## ही काही अशक्य गोष्ट नव्हे

मी आपल्या पुढे अशक्य, अव्यवहार्य, गोष्ट सांगत नाही. मी वर

उल्लेख केल्याप्रमाणे वीरत्वपूर्वक अहिंसक प्रतिकार केलेल्या कांही व्यक्तींची उदाहरणे जगाच्या इतिहासात सांपडतात. आपल्या धार्मिक श्रद्धेसाठी कोणत्याही प्रकारचा हिंसात्मक प्रतिकार न करता, आपल्या प्राणाचाच बळी दिल्याची उदाहरणे खिस्ती धर्मांच्या इतिहासात वाटेल तेवढी भरलेली आहेत. इतर धर्मांच्या इतिहासातही अशा प्रकारची उदाहरणे पुरेशी आहेत.

## व्यक्तीला जे साध्य झाले ते समूहाला असाध्य नाही

अहिंसक प्रतिकार काही विशिष्ट व्यक्तीच करू शकतील, सामान्य जन–समूहाकडून ते शक्य नाही असे कोणी म्हणू शकेल. परंतु ही मान्य होण्यासारखी गोष्ट नव्हे.

खरोखर पाहिल्यास, मानवी जीवन कोणत्या ना कोणत्या रीतीने पुढे चालत राहिलेलेच आहे. हेच मानवकुलाचे अनुभवसार होय. त्यावरून प्रेमच जगावर राज्य करीत आहे, अशा निर्णयाला मी आलो आहे. जगावर राज्य करणारी मूलभूत शक्ती द्वेष असती तर मानवजात कधीच निर्नाम होऊन गेली असती.

सारांश, भारताने अहिंसामार्ग स्वीकारल्यास, निःसंदेहपणे तो आत्म-रक्षण करू शकेल. त्यात तो जयशाली झाल्याशिवाय राहणार नाही.

□ □ □

# अहिंसात्मक प्रतिकार

## गांधीजी

[ दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या शेवटी जपानी सैन्य आपल्या देशाच्या पुढील दरवाजा पर्यंत आले होते. आक्रमण करण्याची सिद्धताही त्यांची होती. त्या वेळी गांधीजींनी त्यांना अहिंसक मार्गाने, केवळ आपल्या आत्मतेजाने कशा रीतीने तोंड द्यावे याविषयी दिलेल्या सूचना आजच्या प्रसंगींही आम्हांला मार्गदर्शक होऊ शकतील म्हणून त्या येथे दिल्या आहेत. ]

जपानी सैन्य आमच्या देशाच्या उजू दारी येऊन ठेपले आहे. अहिंसक रीतीने या प्रसंगाला कसे तोंड दिले पाहिजे? आमचा देश अजून ब्रिटिशांच्या ताब्यात आहे. आम्ही स्वतंत्र असतो तर जपानी सैन्य आमच्या देशात प्रवेशच करू शकणार नाही, अशी अहिंसक योजना हाती घेऊ शकलो असतो. तथापि आज आहे या परिस्थितीतही ते आमच्या देशात येऊन उतरताक्षणीच आम्ही आमचा अहिंसक प्रतिकार प्रारंभ करण्यास हरकत नाही. या अहिंसक योजनेप्रमाणें आम्ही कोणत्याही रीतीने त्यांच्याशी सहकार करता कामा नये. त्यांना कोणतीही जवळीक देऊ नये. आमच्या देशाचा अपहार करण्यासाठी आलेल्या व्यक्तींना जवळ न करणे आमचे कर्तव्य आहे. परंतु कोणी एक जपानी वाट चुकून तहानेने प्राण सोडण्याच्या संकटात असला, मनुष्यमात्र म्हणून त्याने आपले साह्य मागितले, तर अहिंसक असे जे आम्ही ते त्या तान्हेलेल्या जपान्यास पाणी मात्र खात्रीने देऊ. कारण आम्ही कोणालाही शत्रु समजत नाही; पण जपानी लोक पाणी पुरविण्याची आमच्यावर जबरदस्ती करतील तर आमचा प्राण गेला तरी चिन्ता नाही, आम्ही त्यांचा तो हुकूम कधीच मानणार नाही.

अशा रीतीने प्रतिकार करणाऱ्या आमच्यापैकी सर्वांना ते ठार मारून टाकण्याचा संभव नाही असे नाही. याप्रमाणे अहिंसक प्रतिकार करण्याच्या

...२

पार्श्वभूमीला एक निष्ठा आहे. ती अशी की याप्रमाणे उलट शस्त्र न उगारणाऱ्या लोकांना आक्रमक शेवटपर्यंत सारखा ठार मारत राहणे शक्य नाही. काही काळानंतर त्याच्या मनाला अशा प्रकारच्या हिंसक कृत्याची खंत वाटू लागेल. त्याचे हातच कंटाळून वसतील. थकून जातील. याप्रकारे मी ठार मारीत सुटलो तरी उलट हात सुद्धा न उचलणारी ही असह-काराची अपूर्व शक्ति पाहून तो चकित होऊन आपल्या मनातच चिंतन करू लागेल. त्याच्या मनातच चलविचल होण्यास प्रारंभ होईल. आणि हे हत्याकांड येथेच विराम पावण्याचा संभव आहे. पण जपानी लोक पाषाणहृदयी होऊन एकसारखे सत्याग्रहींचा संहार करीत राहणेही संभवते. अशा परिस्थितीतही अहिंसक प्रतिकार करणारे जयशालीच होतील. कारण, शरण न जाता स्वतःचे बलिदान देऊन त्यांनी विजय मिळविला असे होईल.

अशा प्रकारे अहिंसक प्रतीकार करणारे थोडेच लोक असणार. त्यामुळे तात्कालिक दृष्टीने पाहिल्यास काहीही परिणाम झाल्याचे दिसून येणार नाही. परंतु भविष्यकालात त्यांचे उज्वल उदाहरण दीपस्तंभाप्रमाणे उपयोगी पडेल. अहिंसक वीर कोठेही असले तरी शान्त चित्ताने मृत्यूचे स्वागतच करणार, पण अत्याचारी लोकांपुढे कधीही वाकणार नाही. मूक, अज्ञानी कोट्यवधी भारतीयाकरितां ते या प्रकारे आक्रमकांशी सामना देऊन बलिदान झालेले दिसतील. अहिंसक प्रतिकार करणाऱ्यांची संख्या पुरेशी मोठी नसल्यामुळे ते आपले ध्येय साध्य करून घेण्यास असमर्थ ठरतील हे खरे. अशा प्रसंगातही त्यांनी आपण धरलेला मार्ग सोडता कामा नये. शेवटपर्यंत केवळ आपल्या आत्मबळाने आपला प्रतिकार स्थिरपणे कायम राखला पाहिजे.

त्याप्रमाणे, आपली शस्त्रे-अस्त्रे वाढवीत गेल्यामुळे होणाऱ्या संभाव्य निश्चित घातक परिणामाच्या बाबतीत देखील आपल्या "यंग इंडिया" पत्राद्वारे गांधीजींनी १९२९ साली आम्हांला इशारा देऊन ठेवलेला आहे. ता. २२-८-२९ च्या अंकात त्यांनी असे लिहिले आहे की,

"अमेरिका, इंग्लंडसारख्या देशांनी हाती घेतलेल्या प्रत्येक कार्याची योजना आम्ही अनुसरली पाहिजे अशी रूढि आमच्या लोकांमध्ये सन्मान्य

होऊन बसली आहे. अमेरिका प्रत्येक चोवीस तासाला दोन कोटी डॉलर, आपले सैन्य व आरमार यांवर खर्च करीत असते. हे आकडे आमच्यात दिङ्मूढता उत्पन्न करण्यासारखे आहेत. आजच्या युगात युद्धामध्ये वैयक्तिक शौर्य व वीर्य याला महत्त्व राहिलेले नाही. केवळ पैसा आणि विनाशक शक्तीच्या नव्या नव्या अस्त्रांचा शोध लावणाऱ्या आसुरी शोधक बुद्धीचा खेळ चालू आहे. केवळ एक बटन दावले म्हणजे बस्स! लक्षावधि पुरुषांना, स्त्रियांना आणि अर्भकांना ठार मारणारे विषारी बॉंब आम्ही फेकू शकतो. आम्ही आमच्या देशाचे रक्षण करण्यासाठी अशी आसुरी पद्धति अनुसरण्याची इच्छा करावी काय? एखाद्या वेळी अशी इच्छा केली तरी त्यासाठी लागणारी धनसंपत्ती आमच्याकडे आहे काय? आताच आमच्या सैन्याचा खर्च असह्य झालेला आहे अशी आमची तक्रार आहे. इंग्लंड-अमेरिकेचे अनुकरण करावयाचे असेल तर शेकडो पटींनी आणखी खर्च वाढवावा लागेल. त्याच्या जागी आपण आपलाच स्वतंत्र मौलिक नूतन मार्ग, शान्तीचा आत्मशक्तीचा मार्ग विकसित का करून घेऊ नये?

आज आपण अहिंसा अंगीकारलेली आहे हे ठीक. परंतु हे सर्व आमच्या दुर्बलतेमुळे आणि आमच्याकडे शस्त्रे, अस्त्रे नसल्यामुळे आहे. खरोखर आम्हांला पाहिजे आहे वीरांची अहिंसा. आमच्या अमोघ आत्मशक्तीच्या जाणिवेने आम्ही हिंसामार्गाचा तिरस्कार करून अहिंसामार्गच हाती घेतला पाहिजे. आमच्यामध्ये भविष्यकालाचे आकलन करण्याची शक्ति-कल्पना शक्ति असेल तर, जग कोठे प्रवाहपतित होऊन वाहत जात आहे त्याचे ज्ञान आम्हांला होऊ लागले असेल तर अहिंसा-मार्ग बुद्धिपुरःसर हाती घेण्यास आपण पुढे येऊ. पण आज आपण बाह्य झगझगाटामुळे मोहित झालेले आहोत. आमच्या डोळ्यांपुढे प्रतिदिनी चाललेले पतंगनृत्य, काल- पुरुषाचे मायातांडव, हीच प्रगति आहे अशा भ्रमाने आम्हांला गुरफटून टाकले आहे. हे सर्व आम्हांला विनाशाकडे नेत आहे हे कबूल करण्यास आमचे मोहित झालेले मन तयार नाही. पाश्चात्त्य राष्ट्रांनी घालून दिलेल्या चौकटीत बसून त्यांचे अनुकरण करणे म्हणजे आत्मघातच होय ही गोष्ट आपण पक्की समजून घेऊ या. त्यांच्या हिंसेचे प्राबल्य आज त्यांनी कितीही मिरविले तरी जगावर साम्राज्य गाजविणारी एक नीतियुक्त

सत्यशक्ति आहे, हे आपण समजून घेऊ या. अहिंसक शक्तीचा आत्मबलाचा विकास करून घेण्याच्या मार्गाला लागणाऱ्या आमचा उद्धार करून घ्यावयाचा असेल व जगाच्या प्रगतीतील आमचा वाटा आम्हाला उचलावयाचा असेल तर आम्ही शान्तिमार्ग, अहिंसेचा मार्गच हाती घेतला पाहिजे.

## हिटलरासारख्या निर्दय सर्वाधिकाऱ्यापुढे अहिंसक प्रतिकार चालू शकेल काय ?

" प्रतिस्पर्ध्याच्या अंतःकरणामध्ये नीतीला थोडी तरी मान्यता असली तरच त्याच्यावर आमच्या अहिंसेचा परिणाम होऊ शकेल. त्याचे अंतः-करण थोडा वेळ का होईना वितळेल. पण हिटलरसारखे सर्वाधिकारी म्हणजे मनुष्यरूपी राक्षसच होता. त्यांच्यामध्ये करुणेचा एक लेशही असत नाही. आमच्या अहिंसेने त्यांच्यामध्ये कोणतीही अनुकूल प्रतिक्रिया उत्पन्न होणे शक्य नाही. हे सर्वाधिकारी लोक म्हणजे मानवताशून्यच असतात. त्यांच्याविषयी अहिंसेचा प्रयोग करणे म्हणजे वाघाच्या तोंडात गायीचे जाणे नव्हे काय ?" अशा प्रकारचा वाद मधून मधून वारंवार ऐकावयास येतो.

याला गांधीजींचे उत्तर असे आहे की, " हे निरंकुश सर्वाधिकारी, हे राजराक्षस, अहिंसेला, सत्याग्रहाला आपला परिणाम करण्यास अवकाशच देणार नसतील तर, सत्याग्रहाची मात्रा काही त्यांच्यापुढे चालणार नाही. असे म्हणणे म्हणजे, सत्याग्रहाच्या सामर्थ्याविषयीचे अज्ञान व्यक्त करण्या-सारखे आहे. सत्याग्रह, अहिंसा आपला परिणाम करण्याच्या बाबतीत या निरंकुश प्रभूंच्या सौजन्यावर अवलंबून नाहीत, आपल्या आत्मशक्तीच्या बलानेच ती काम करीत राहते. दुसऱ्या कोणत्याही आधारावर ते अवलंबून नाही. हिंसेशक्तीपेक्षा अहिंसा अधिक परिणामकारक असते. उदाहरणार्थ हिटलर, मुसोलिनी, स्टालिन आदि पुरुष आपली हिंसाशक्ती कितीतरी परिणामकारक आहे असे झटकन् सिद्ध करून दाखवतील. तथापि त्याचा परिणाम केवळ तात्पुरता व क्षणिक असतो. बुद्ध-ख्रिस्त यांच्या अहिंसेचा परिणाम शाश्वतपणे मानवकुलावर झालेला दिसून येतो; एवढेच

९४५८६

नव्हे, शेकडो वर्षांनंतर त्यांच्या कारुण्यमय जीवनाचा परिणाम अधिकाधिक प्रभावशाली होत जात असतो, अर्थात् अहिंसा शक्ति आपले काम निरंतर चालवीत राहते, तिची क्रिया केवळ अंशमात्र स्थूल दृष्टीला गोचर होत असते. तिची क्रिया बहुतांशी सूक्ष्मरूपाने आपले काम करीत राहते. ते आमच्या स्थूलदृष्टीला गोचर होऊ शकत नाही. तथापि ती अत्यंत क्रियाशील, तिचे परिणाम अनंत, ते आपण अधिकाधिक आपल्या आचरणात आणू तसतसे ते अधिकाधिक परिणामकारी होत जातात. शेवटी तिची अगाध, असीम प्रभा प्रकट होत असते. मग अखिल जग आश्चर्यचकित होऊन 'ओहो, हे एक अद्भुत, एक दिव्य, अघटित झाले !' असे उद्गार काढील. या सूक्ष्म, एका महान् सुसज्ज अदृश्य सत्शक्तीमुळे, या प्रेमशक्तीमुळे, या अहिंसा-शक्तीमुळेच जगातील सर्व दिव्य घटना संभवतात. सत्याग्रही कोणाच्याही अनुग्रहावर अवलंबून नसतो. परमात्म्यावरील त्याची श्रद्धा हाच त्याचा एकमेव आधार. हा परमात्म्याचा आधार सत्याग्रह्याला सतत मिळत असतो, हा त्याचा अचल विश्वास. या श्रद्धेच्या बळावर तो महा घोर संकटांनासुद्धा न भीता, न गांगरता, प्रतिकार करितो. या श्रद्धेमुळे तो अजिंक्य व अजेय होऊन बसतो. त्याचप्रमाणे मनुष्यस्वभावही मूलतः एकच प्रकारचा असतो. त्यावर कित्येक दुष्ट काळी आवरणे पडून त्याचे मूलरूप दिसेनासे झाले तरी त्यातील शिवतत्त्व, सत्य, आत्मा, दैवी अंश नाश पावत नाही. तो शेवटी केव्हा तरी सत्य-प्रेमाच्या हांकेला ओ दिल्याशिवाय राहत नाही, हीच सत्याग्रहीची दृढनिष्ठा होय."

## एक ऐतिहासिक उदाहरण

गांधीजींच्या उपर्युक्त प्रतिपादनाच्या सत्यतेच्या पुष्ट्यर्थ एक ऐतिहासिक उज्वल घटना त्यांचे अंतेवासी श्री. प्यारेलाल यांनी आपल्या 'महात्मा गांधी : लास्ट फेज' नावाच्या ग्रंथामध्ये आवर्जून निर्दिष्ट केलेली आहे. ती घटना अशी:—"रोमन साम्राज्यामध्ये 'नीरो' नावाचा अति क्रूर राजा होता. त्याकाळी ख्रिस्तीधर्माचा प्रसार झाला नव्हता. 'ख्रिस्ती धर्म म्हणजे एक नास्तिक पंथ, ख्रिस्ती लोक धर्मलंड, राजद्रोही, नीतिभ्रष्ट असतात' असे त्या काळची रोमन साम्राज्यातील सुशिक्षित

जनता समजत होती. त्यांना निर्नाम करणे योग्यच आहे, असे गणित त्यांनी घातले होते. रोमन सम्राट् नीरो हा रात्री त्याच्या भव्य अर्ध-वर्तुळाकृति नाटकगृहामध्ये चाललेल्या सरसलीला उज्वलित करण्यासाठी या ख्रिस्तपंथीयांना घट्ट बांधून जिवंत जाळीत असे. एवढेच नव्हे, भुकेलेल्या सिंहाच्या तोंडात त्यांना फेकून देत असे. अशा रीतीने तो आपला सण साजरा करीत असे. ख्रिस्ती लोक त्याकाळी फारच अल्पसंख्याक होते. त्यांना निर्नाम करणे नीरोसारख्या निरंकुश सत्ताधाऱ्याला अत्यंत सुलभ होते. परंतु अशा परिस्थितीतही त्यांना निर्नाम करणे निरोला साध्य होऊ शकले नाही. याला एकच एक कारण म्हणजे त्या काळीं या ख्रिस्ती लोकांनी आचरलेली उज्वल, अनुपम अहिंसा. त्यांना जिवंत जाळण्यास नेताना त्यांच्या मुखावर यत्किंचित्‌ही द्वेषभावना असत नसे. दुःखही दिसत नसे. आत्मविजयाचा आनंद अनुभवित हंसतमुखाने ते स्वतःला जाळण्यास सज्ज केलेल्या चितेकडे स्थिरभावाने आपल्या पायाने चालत जात असत. प्रथम प्रथम ह्या दृश्याने रोमन सैनिक, प्रतिष्ठित लोक चकित होऊन जात असत. पण पुढे पुढे या ख्रिस्ती लोकांचा निर्धार पाहून ते अधिकच आणखी एवढे क्रोधाविष्ट होऊन जात असत. परंतु त्या ख्रिस्ती लोकांची वीर, शान्त, धीरगंभीर उदात्त वृत्ति थोडीदेखील कमी झाली नाही. त्यांची ही दृढ अहिंसेची प्रथा शेवटी या रोमन प्रतिष्ठित लोकांची स्वयं-मन्यता वितळवू शकली. त्यांचा निर्धारच कोमेजून गेला. ही सूक्ष्म, अव्यक्त अहिंसा शक्ती रोमन सैनिकांचे अभेद्य लोखंडी कवचही भेदून त्यांच्या अंतःकरणात आपला प्रभाव घुसवू शकली. प्रतिष्ठित कुटुंबातील स्त्रियांमध्ये या शक्तीचे सौम्य तेज नवविचारांचा प्रकाश पसरवू शकले. शेवटी नीरोलाच या ख्रिस्ती लोकांवर चालवलेला राक्षसी अत्याचार स्वतःच बंद करावा लागला, आवरावा लागला. अशा लोकांकडे आपण तिरस्कार दृष्टीने पाहणे योग्य नाही, असे उद्गार रोमन समाजातील लोकांच्या तोंडून बाहेर पडू लागले.

या संबंधात गांधीजींनी खालील उद्गार काढले आहेत:—

“ आधुनिक विज्ञान, भौतिकशास्त्रे यांनी अशक्य समजल्या जातील अशा अनेक घटना शक्य व सिद्ध करून दाखविलेल्या आहेत.

अध्यात्म शास्त्रातील शोध यापेक्षा अनंतपटीने अदभुत आहेत. या अध्यात्म क्षेत्रात शुद्ध प्रेम, अहिंसा ही एक सार्वभौम शक्ति आहे. अध्यात्मशक्तीचे मूळच्च प्रेम होय. तथापी या विश्वप्रेमामध्ये, या अहिंसेमध्ये सुद्धा असलेल्या महादिव्य शक्तींचा शोध अद्यापि लागलेला नाही. या अहिंसेच्या गूढ-शक्तींचा शोध लावण्याचे आवश्यक साधन म्हणजेच चित्तशुद्धि होय. आमच्या नित्य उपयोगाच्या पाण्यासारख्या सामान्य वस्तूमध्ये असलेल्या अपार शक्तींचा देखील आम्ही आतापर्यंत संपूर्ण पत्ता लावण्यास समर्थ झालेलो नाही. तर मग, अहिंसेसारख्या सूक्ष्म, अतिसूक्ष्म चित्-शक्तीमधील सुप्त, अद्भुत सामर्थ्याला कमी लेखणे योग्य नव्हे. अचल श्रद्धेने त्या अहिंसाक्षेत्रात शोध लावीत लावीत जसजसे जाऊ तसतसे त्यातील अगाध, भव्य सामर्थ्य अनुभवाला आल्याशिवाय राहणार नाही. आमच्या नित्य सामान्य जीवनक्रमामध्येही क्रोधाला शांतीने जिंकणे हाच खरा उपाय असल्याचा अनुभव क्षणाक्षणाला येत असतो. यावरून अत्यंत क्रूर हिंसेला अहिंसेच्या पराकाष्ठेने जिंकणेच्च योग्य, तसाच उत्तम परिणाम-कारी उपाय होय, अशा निर्णयाला येण्यामध्येच्च आमची सुरक्षितता आहे.

## निर्भय अहिंसेने विषसर्पही प्रभावित होतो

मनामध्ये क्रोधभाव, वैरभाव नसलेल्या शांत, अभय वृत्तीने अशाच प्रकारे विषसर्पही प्रभावित करिता येतात. गांधींच्या आफ्रिकेतील फिनिक्स आश्रमामध्ये होऊन गेलेल्या एका घटनेविषयी त्यांच्या एका अंतेवासी भगिनीने—श्रीमती मिल्ली पोलक हिने—गांधींविषयी लिहिलेल्या एका पुस्तकात विस्ताराने लिहून ठेवले आहे. ती घटना अशी:—

एक युरोपियन सद्गृहस्थ गांधीजींच्या फिनिक्स आश्रमामध्ये येऊन राहिले होते. ते प्रथम चतुर शिकारी व मांसाहारी होते. आफ्रिकेच्या अपरिचित भागातून ते हिंडत-फिरत होते. त्या वेळी आत्मरक्षणासाठी नेहमीच्या पद्धतीप्रमाणे आपल्या बंदुकीचा निरंकुशपणे उपयोग करीत असत. पण होता होता त्यांच्या मनामध्ये विचारक्रांति झाली असावी. त्यांनी गांधीजींबरोबर राहून आपल्या जीवनामध्ये पूर्ण परिवर्तन करून घेतले. आश्रमामध्ये साधे जीवन ते घालवीत. आश्रमातील प्रत्येक कामा-

मध्य, शारीरिक श्रमांमध्येही ते भाग घेत. आपला उरलेला समय अभ्यासात व ध्यानात ते घालवीत होते.

एके दिवशी त्यांना एका जरूरीच्या कामानिमित्त तेथून १५ मैलांवर असलेल्या दरबान शहरी जावयाचे होते. म्हणून आपली सायकल आणण्यासाठी त्यांच्या राहत्या झोपडीत ते गेले. त्या वेळी तेथे एक विषसर्प तथा सर्पिणी एकमेकांना बिलगून त्यांच्या सायकलजवळच असलेली त्यांच्या नजरेला आली. ती दोन्ही त्या गृहस्थाच्या दृष्टीला पडण्यापूर्वीच, त्याला स्वतःला नकळत, त्या सर्पांच्या आरामामध्ये थोडा-बहुत भंग झालेला असला पाहिजे. कारण, ते दोन्ही सर्प आपला फडा उचलण्यास आरंभ करीत होते. ते गृहस्थ घाबरे न होता शान्त वृत्तीने स्तब्धपणे उभे राहून, त्या सर्पांनी परस्परांना मारलेली मिठी आता सावकाशपणे सोडून ते वेगळे होत असलेले निरीक्षण करीत होते. झोपडी लहानच होती, सामानाने भरलेली होती. इकडे-तिकडे जाण्यास जागा नव्हती. दरवाजातून पार होण्यास अवकाश नव्हता. कारण, त्या विषसर्पांना स्वतः सामोरे गेल्याशिवाय दरवाजातून त्या गृहस्थांनी पार होणे शक्य नव्हते, त्यांना सायकलची अत्यंत जरूरी होती. एक क्षणभर त्या सर्पांना ठार करण्यास एखादे साधन हातात घेण्याचा विचारही त्यांच्या मनात आल्याशिवाय राहिला नाही. पण दुसऱ्या क्षणीच आपण मान्य केलेल्या नूतन जीवनक्रमाचे व्रत त्यांच्या ध्यानी आले; आपल्या जीवनाच्या मूलभूत श्रद्धेचे त्यांना स्मरण झाले. "प्रेम सर्वांना जिंकू शकेल. देवाने उत्पन्न केलेल्या कोणत्याही प्राण्याला मनुष्याने भिण्याचे कारण नाही." या आपल्या श्रद्धेच्या बलाने आपल्या मनातील शांतता निश्चल राखून, सर्व प्रकारची भीती त्यांनी आपल्या मनातून काढून टाकली. एवढेच नव्हे तर त्या प्राण्याविषयी आपल्या मनामध्ये कोणत्याही प्रकारचा हेवादावा, घृणा अथवा परकेपणा त्यांनी येऊ दिला नाही. आपल्या अचल वृत्तीने मनाची शांती कायम टेऊन झोपडीच्या दरवाजाकडे जाऊन तेथे असलेल्या एका खांबाला चिकटून ते उभे राहिले. इतक्या अवधीत ते दोन्ही विषसर्प पूर्ण जागृत झालेले होते, ते सरपटू लागले होते. सावकाश इकडे-तिकडे हलू लागले होते. पहिल्या विषसर्पाने चहूकडे पाहून घेतले आणि ते गृहस्थ उभे

होते त्या बाजूला सावकाश सरपटत दरवाजाकडे तो चालला. तथापि ते गृहस्थ स्थिर चित्तानेच स्तब्धपणे उभे होते. विषसर्प त्यांच्याजवळ आला व नंतर त्यांना ओलांडून बाहेरच्या मैदानात गेला. दुसरा सर्प पहिल्या सर्पाच्या मागोमाग येतच होता. त्याचे डोके एकदा उजव्या बाजूला तर एकदा डाव्या बाजूला वळत होते. शेवटी ते गृहस्थ उभे होते तेथे त्यांच्या-जवळ तो आला आणि त्यांना थोडा स्पर्श केल्यासारखे करून दरवाजा-तून चालता झाला. त्या गृहस्थाला कोणत्याही प्रकारे अपाय केला नाही.

या संबंधात फिनिक्स आश्रमामध्ये आम्हांला, भारतामध्ये अनेक साधु पुरुष विविध जंगली प्राण्यांच्या सान्निध्यात, अपायकारक गणल्या गेलेल्यांच्या निकट संपर्कामध्ये कसे अभय वृत्तीने राहतात, त्या जंगली प्राण्यांपासून त्यांना कोणत्याही प्रकारचा अपाय कसा होत नाही. या विषयीची अनेक उदाहरणे गांधीजी सांगत असत.

□ □ □

# अहिंसा मार्गच राष्ट्ररक्षणासाठी सर्वोत्कृष्ट

## जयप्रकाश नारायण

चीनने आपल्या देशावर आक्रमण केले त्यामुळे आमच्या पुढे अनेक समस्या उत्पन्न झाल्या. चिन्यांचा प्रतीकार आम्ही कसा करू शकू, त्यांचा परिहार कसा केला पाहिजे, हा एकच विषय अलीकडे आम्हांला पुरून उरलेला आहे. या एका विषयासंबंधी मी सर्व देशभर बोलत फिरत असतो. आमच्या राष्ट्रावरील चिन्यांचे आक्रमण द्विविध आहे: एक सैनिकी आक्रमण तर एक वेळेला होऊन चुकलेले आहे. हल्ली पुन्हा सैनिक आक्रमण होण्याचा संभव नसला तरी त्याची भीति आहेच आहे. दुसरे म्हणजे, त्यांचे वैचारिक आक्रमण अर्थात् चीनमध्ये झालेल्या क्रांतीचे आक्रमण.

## सैन्यासाठी अपरिमित खर्च

पुन्हा चीन भारतावर आक्रमण करील किंवा नाही हे सांगणे कठिण आहे. सध्या नजीकच्या भविष्यात चिन्यांच्या आक्रमणाची भीति नाही असे अलीकडे नेहरूंनी सांगतले आहे. असे असले तरी जगातील अन्य राष्ट्रे सैनिक आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी ज्या प्रकारची सिद्धता करीत आहेत त्याच प्रकारची सैनिकसिद्धता आमच्या देशामध्ये चालू आहे. चिन्यांची सैनिक शक्ति आमच्या सैनिक शक्तीपेक्षा कितीतरी पटीने अधिक आहे, ही गोष्ट अनुभवास आलेली आहे. म्हणून चिन्यांच्या सैनिक शक्तीचा प्रतिकार करण्याइतकी जोरदार शक्ति आपणही वाढविली पाहिजे, अशा निर्णयाला भारतही आला आहे. पूर्वी सैन्यावर प्रतिवर्षी ४०० कोटि रुपये खर्च होत होते. या वर्षी ९०० कोटि रुपये सैन्याच्या खर्चासाठी अंदाजपत्रकात आमच्या सरकाराने घातले आहेत, परंतु हा केवळ प्रारंभ आहे. हजारो कोटी, कित्येक अब्ज रुपये आपण सैन्यावर खर्च केले पाहिजेत असे नेहरूजींनी प्रथमच सांगून ठेवले आहे. आमचा देश गरीब. अर्धपोटी जीवन कंठणारे कोट्यवधि लोक अमच्या देशात आहेत. असे असूनही आम्हांला कित्येक हजारो रुपये आमच्या रक्षणासाठी खर्च करावे लागणार आहेत. त्यामुळे जनतेला, देशाला किती कष्ट सहन करावे लागतील याची कल्पना आम्हांला सहज करिता येईल.

## यातून जागतिक युद्धही उत्पन्न होऊ शकेल

असे असले तरी देशाच्या रक्षणार्थ शक्य असेल ते सर्व केलेच पाहिजे असे सांगण्यात येते. येथे गंभीरपणे विचार करण्यासारखी गोष्ट ही आहे की सैनिक-सिद्धतेने—ही सिद्धता किती का मोठी असेना—आपण आपले रक्षण करून घेण्यास समर्थ होऊ किंवा काय ?

आमच्या देशाच्या सीमाप्रान्ताच्या प्रदेशाविषयी हल्ली चिनी राष्ट्राने आमच्याशी भांडण आरंभिलेले आहे. कित्येक हजार चौरस मैल भूमि चिन्यांनी आक्रमण करून आपल्या ताब्यात घेतली आहे, असे सांगण्यात येते. आम्ही आता कोठे सैनिक-सिद्धता चालू केली आहे. मग वाटाघाटीने ही भूमि आम्हांला परत न मिळाली तर आम्ही ती युद्ध करूनच परत

मिळवली पाहिजे. अशाप्रकारे चीन व भारत यांच्यामध्ये युद्ध सुरू झालेच तर त्याचा परिणाम काय होईल? चीनही आपली सिद्धता वाढवीतच राहणार. त्याच्या म्हणण्याप्रमाणे भारताने आक्रमण करून आपला प्रदेश पुन्हा परत मिळविण्यास चीन पुन्हा प्रयत्न करणारच. याप्रमाणे चीन-भारत युद्धाचा परिणाम जागतिक युद्धामध्ये होण्याचा संभव आहे. अर्थात् हे सर्व करूनही चीन-भारत तंटा समाप्त न होता, हा जागतिक युद्धाग्नि प्रज्वलित होत गेल्यास पुढे काय परिणाम होईल ?

## युद्धापासून सर्वनाश

युद्धाने कोणतीही समस्या सोडविली जाणार नाही असे आपल्या देशातले त्याचप्रमाणे जगातील विचारवंत लोक सांगतात. भयानक अण्वस्त्रे तयार झालेली आहेत. त्यांचा प्रयोग झाल्यास काय परिणाम होईल हे सर्व लोक जाणून आहेत. म्हणून युद्ध कसे टाळावे, शांती कशी चिरस्थायी करावी, याचा विचार जगातील सर्वच लोक तीव्रतेने करीत आहेत. आजचे जग युद्धाचा अन्त व्हावा अशीच इच्छा करीत आहे.

## गांधीजींचा मार्गच फलप्रद व परिणामकारक

तथापि आमच्या देशात झाला तरी एकच विचार आज चर्चिला जात आहे: "आमच्यावर चीनने आक्रमण केले आहे. वाटाघाटींनी प्रश्न सुटला तर ठीकच, नाही तर युद्धाला आपण तयार झाले पाहिजे." तथापि युद्ध व्हावे की होऊ नये या प्रश्नाचाही आपण विचार केला पाहिजे. युद्धा-शिवाय दुसरा उपायच नाही असे आपण म्हणाल, पण आमच्या स्वातंत्र्याच्या लढ्याच्या वेळी सुद्धा आम्ही याच गोष्टी ऐकल्या, याच गोष्टी प्रतिपादिल्या. सबंध देश गुलामगिरीमध्ये होता. इंग्रजांचे राज्य होते. गांधीजींनी सांगितले:— "ब्रिटिशांची सत्ता नष्ट केलीच पाहिजे, पूर्ण स्वराज्य स्थापिलेच पाहिजे, परंतु शस्त्र मात्र उगारता उपयोगी नाही." आमच्या हातात शस्त्रेंच नव्हती. बहुश: याच कारणाने आम्ही गांधींच्या म्हणण्याला कबुली दिली. परंतु दुर्बल आणि नि:शस्त्र अशा भारतीयांनी अहिंसाशस्त्राने ब्रिटिश साम्राज्य-शाहीला वाकविले, आमचे स्वातंत्र्य प्राप्त करून घेतले. ही देखील इतिहासा-मध्ये अशाप्रकारची पहिलीच घटना होय.

## युद्धाचे दुष्ट चक्र

आज आपण स्वतंत्र झालो आहोत. आमच्या स्वातंत्र्याचे रक्षण हिंसा-मार्गाने, युद्धाने करू शकू, अहिंसेने आपण आपले रक्षण करू शकणार नाही, अशी आमची विचारप्रणाली झाली आहे ! अहिंसेने स्वातंत्र्य प्राप्त करून घेऊ शकू, जगातील बलाढ्य ब्रिटिश साम्राज्यशाहीला अहिंसेने नष्ट करू शकू. मग स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्याचे रक्षण अहिंसेने करणे शक्य होणार नाही काय ? याचा आपण शांतचित्ताने, विचार केला पाहिजे. हिंसेच्या प्रयोगाने, युद्धाने आमच्या समस्या सोडवून घेणे शक्य झाले, आमचे रक्षण करून घेण्यास शक्य झाले तर ठीकच आहे. हरकत नाही, युद्धप्रयोग करूनच पाहू या, असे आपण म्हणू शकाल. पण भारताने वाटेल तितके बलाढ्य सैन्य सज्ज ठेवले तरी आमच्यावर आक्रमण करणाऱ्या कोणालाही आम्ही हार जाणार नाही असे छातीवर हात ठेवून सांगणे शक्य होईल काय ? तसे सांगणे कोणासही शक्य नाही. युद्धाने आमचे रक्षण एक वेळी करून घेतले असे समजा तरीही; व आमच्यावर हात उगारून आलेल्या आक्रमकाचा आम्ही पराजय केला तरी, तेवढ्याने युद्धाची समाप्ती होऊ शकत नाही. पुनःपुन्हा युद्ध हे होत राहाणारच. सन १८७० मध्ये जर्मनीने फ्रान्सविरुद्ध युद्ध केले. फ्रान्सचा पराजय झाला. जर्मनीचा विजय झाला. पण त्याचा परिणाम काय झाला? इ. स. १९१४ मध्ये पुन्हा युद्ध झाले त्यावेळी जर्मनीचा पराभव झाला. फ्रान्सचा विजय झाला. पण पराजित असा जर्मनी स्वस्थ बसला नाही. प्रथम फ्रान्सचा पराजय झाल्यावेळी फ्रान्सही गप्प बसला नाही. आता जर्मनी पराजित झाला तोही स्वस्थ बसला नाही. पुन्हा इ. स. १९३९ मध्ये युद्ध झाले. अर्थात् युद्धाने शांती प्रस्थापित होऊ शकत नाही, हे सिद्ध झाले. प्रश्न सुटत नाही हे दिसून आले. हेच युद्धाचे दुष्ट चक्र. म्हणून या दुष्ट चक्रातून पार होण्यासाठी एकच एक मार्ग म्हणजे अहिंसा मार्ग होय.

## अहिंसेनेच शाश्वत परिहार

अहिंसा मार्गात पराजय असतच नाही, असे गांधीजींनी सांगून ठेवले आहे. या मार्गात दोन्ही पक्ष विजयी होत असतात. ब्रिटिशदेखील आज आपला

पराजय झाला आहे असे मानीत नाहीत. दोघांचाही विजय झालेला आहे. पण हिंसेच्या युद्धामध्ये जय-पराजयाची एक साखळीच तयार होत असते त्याला शेवट नाही, अंत नाही.

यासाठी अहिंसामार्गाने आमच्या देशाचे रक्षण करून घेण्याचा क्रम कोणत्या प्रकारचा असावा या गंभीर समस्येविषयी विचार करणे आम्हा सर्वांचे कर्तव्य आहे.

□ □ □

# अहिंसा मार्गाने देशाचे रक्षण कसे होऊ शकेल ?

## जयप्रकाश नारायण

अखिल देशाने अहिंसा विचार स्वीकारल्यास त्याचा अर्थ काय होईल? भारतातील सैन्य विसर्जन होईल. भारताच्या सामाजिक रचनेमध्येही अहिंसेच्या तत्त्वानुसार परिवर्तन घडून येईल. या परिवर्तनाविषयी विनोबाजी आम्हांला विशदीकरण करीत आले आहेत. एकमेकांना शोषण करीत राहण्याचे सोडून सर्वांनी जे काय असेल ते वाटून घेऊन खावे, हे त्यांच्या उपदेशाचे रहस्य आहे. अहिंसक समाजाचे हेच लक्षण आहे. यातूनच आमची अहिंसाशक्ति वाढणार आहे. ग्रामदानाचा आदेशही हाच आहे.

### सैन्याचे विसर्जन आणि सामाजिक परिवर्तन

आज तरी आमचे जीवन कोणत्या विचाराने चालले आहे ! आमच्यातील प्रत्येकजण, मग तो गरीब असो, मध्यम वर्गातील असो, श्रीमंत असो, स्वतःसाठी स्वतःच्या बायकामुलांसाठी, स्वतःच्या आप्तेष्टांसाठी, शक्य तितके स्वतः शोषण करावे, संग्रह करावा अशीच अपेक्षा करीत असतो. असे करीत असताना त्यायोगे दुसऱ्यांना किती अन्याय होईल, आपण

आपल्याला आवश्यक असेल तेवढेच घेत आहो अथवा त्यापेक्षा अधिक घेत आहो, याविषयी थोडाही विचार तो करीत नाही. त्यामुळे समाजामध्ये विषमता वाढत राहते, सामाजिक संघर्ष उत्पन्न होतो, अशांतता मूळ धरते. अशा प्रकारचा कोणताही विचारच आम्ही आमच्या डोक्यात येऊ देत नाही. दुसऱ्याचे घ्यावे हा एकच विचार, दुसऱ्याला देण्याची बुद्धीच नाही. असे असूनही केवळ काही थोड्या लोकांना मात्र अशाने प्राप्ती होत असते बाकीचे उपाशी पोटी राहतात. एकमेकांना आपण लुबाडीत असतो, परंतु काही थोड्या लोकांच्याच हाती डबोले लागते. विनोबाजी काय सांगत असतात ? पृथ्वीवर पुष्कळ साधनसंपत्ति आहे, भारतातही आहे. लोकांनी आपापली पूर्णशक्ति वापरून श्रम करावेत आणि एकमेकांना देऊन खावे, उपभोगावे.

आज केवळ दुसऱ्याचे घेण्याचेच काम चालले आहे. देणे माहितच नाही. याचा परिणाम काय ? बहुसंख्य लोक भुकेने व्याकूळ झालेले राहतात. पण आपण एकमेकांना देत राहण्याचा उपक्रम हाती घेतल्यास कोणीही उपाशी राहणार नाही. देशामध्ये कल्याणप्रद ऐक्य अस्तित्वात येईल. अशा प्रकारच्या ऐक्याची शक्ति अमोघ असते. त्यामुळे आमचा पराक्रम वाढतो. संपत्ति वृद्धि पावते आपापल्यामध्ये वाटून घेऊन उपभोग घेता येतो. त्यायोगे सर्वच सुखी होतात, सर्वोदय होतो.

आम्ही अहिंसेचा विचार मानणारे झालो तर देशामध्ये सैन्य राहणार नाही ही एक गोष्ट. त्याप्रमाणे आमच्या जीवनपद्धतीतही परिवर्तन होईल, ही दुसरी गोष्ट.

## अहिंसात्मक असहकार : एक अस्त्र

अशा आदर्शाला डोळ्यांपुढे ठेवून चालणाऱ्या राष्ट्राशी असाच सर्वत्र समभाव आचरणाऱ्या देशाशी, दुसरा एखादा देश भांडण काढील, युद्ध जुंपील असा संभव फारच कमी. एखाद्या वेळी तंटा उत्पन्न झालाच तर त्याचा परिहार शांततेच्या, वाटाघाटींच्या मार्गानेच होण्याचा संभव अधिक. तथापि गांधीजींच्या आश्रमातसुद्धा चोरी होत होती. त्याचप्रमाणे अशा

शांतिमय राष्ट्रावरसुद्धा अन्य राष्ट्र आक्रमण करील असे क्षणभर मानून चालू या. या जगामध्ये दुष्ट लोक असणारच. भारताने अहिंसामार्ग अंगीकारला तरी त्याच्यावर दुसऱ्याचे आक्रमण झाले आहे अशी कल्पना करू या. भारी दांडगे सैन्य आमच्या देशावर चाल करून आले तर आपण काय करू शकू ? याला आमचे उत्तर काय ? ब्रिटिशांचे येथे राज्य असतानाही आमच्या जवळ शस्त्रे नव्हती. ब्रिटिशांच्या जवळ सैन्य होते, जहाजे होती, विमानेही होती. आमच्याजवळ काहीच नव्हते. असे असूनही आम्ही स्वातंत्र्य मिळविलेच आहे. त्याच प्रकाराने आजही आम्ही करू शकणार नाही काय ?

समजा आसाम प्रान्तात चिनी सैन्य घुसले. त्यावेळी आसामातील लोक त्यांना म्हणतील की, "तुम्ही बलात्काराने आमच्या घरामध्ये घुसलेले आहांत म्हणून आम्ही आपले स्वागत करू शकणार नाही. तुमच्याशी कोणत्याही प्रकारे आम्ही सहकार करणार नाही. तुमचे कोणतेही काम आम्ही करणार नाही. धान्य वगैरेही देणार नाही. रेल्वेही चालविणार नाही, रस्तेही तयार करणार नाही, तुमच्याशी आमचा संपूर्ण असहकार. तुमच्या पुढे आम्ही केव्हाही मान वाकवणार नाही. आम्ही स्वाभिमानी व स्वतंत्र लोक. तुमचे हुकूम आम्ही मानणार नाही. तुम्ही वाटेल ते अत्याचार करू शकाल, आम्ही मरणाला तयार होऊनच बसलेलो आहो." असे झाल्यास परिणाम काय होईल ? मग, चीन आमच्या लोकांना ठार करीत कन्याकुमारीपर्यंत जाईल काय ? असे होणे कधीच शक्य नाही. हिंसक शस्त्रास्त्रांच्या युद्धाची गोष्टच वेगळी. हिंसक युद्धामध्ये वाटेल ते होणे शक्य आहे. हिटलर रशियाचे हृदय म्हणून समजल्या जाणाऱ्या स्टालिनग्राडापर्यंत येऊन पोचलेला होता. बर्लिनचा पूर्ण नाश झालेला होता. हिंसक युद्ध चालू राहिल्यास काहीही होणे शक्य आहे. केवळ युद्धाला गेलेले सैनिकच नव्हे, तर सामान्य नागरीकसुद्धा मरतात, पोरें बाळे अर्भकेही मरतात. बॉंब पडून येथे सभेत बसलेले आपणही मरू शकू. दवाखान्यात अंथरुणावर पडलेले रोगीही मरतात. भारताची युद्ध-विमाने पेकिंगवर जाऊन बॉंब फेकणार, आणि चिन्यांची विमाने दिल्लीवर बॉंब टाकणार.

परंतु अहिंसक प्रतिकारामध्ये आम्ही काय करितो ? आम्ही शस्त्रे वर उचलतच नाही. केवळ गुलामगिरी स्वीकारणार नाही एवढा निर्धार करितो. मरणाची भीतीही सोडून देतो. त्यांच्याशी म्हणजे चिन्यांशी कोणत्याही रीतीने सहकार करीत नाही. अशाप्रकारे प्रतिकार चालू राहिल्यास चिनी सैन्याला कन्याकुमारीपर्यंत जाण्याची आवश्यकताच राहत नाही !

अशा प्रकारचे अहिंसात्मक युद्ध एका आठवड्यापेक्षा अधिक दिवस चालूच राहणार नाही असे मी मानतो. आमच्याकडे सैन्य नसेल तर, आम्ही अहिंसेचा स्वीकारल्यास, चिनी सैनिक सर्व भारतीयांना ठार करतील, भारत देश संपूर्ण नाश पावेल असे लोक म्हणत असतात. पण असे होणे केव्हाही शक्य नाही. एवढेच की आम्ही अहिंसा खऱ्या मनाने स्वीकारलेली असली पाहिजे. मग मात्र आमचा नाश होण्याचा संभव कधीच असणार नाही. परंतु आम्ही भ्यालो, नेभळे झालो, नपुंसक बनलो तर आमचा नाश खचित होईल. पण अहिंसेचे वीरत्व आमच्यामध्ये प्रकट झाले तर आमचा नाश कधीच होणार नाही.

## शत्रुसैन्यामध्ये परिवर्तन

मी कोणत्या आधारावर हे सर्व सांगत आहे ते समजून घ्या. भारताचे आणि चिन्यांचे सैन्य यांची लढाई जुंपलेली आहे असे समजू या. त्या वेळी भारतीय सैनिक चिनी सैन्याला शक्य तितक्या अधिक संख्येने ठार करण्यास आतुर असणार, त्याचप्रमाणे चिनी सैनिक शक्य तितक्या अधिक हिंदी सैनिकांना ठार करण्यास आतुर असणार. यात त्यांना आनंद वाटत असणार. अशा वेळी त्यांच्या पुढे कोणत्याही तऱ्हेचा नैतिक प्रश्नच उभा राहणार नाही. कोणत्याही प्रकारची शंका व संकोचही त्यांच्या मनामध्ये येणार नाही. याप्रकारे शक्य तितक्या अधिक सैनिकांना ठार मारीत जाणे हा आपला धर्म आहे असे त्यांना वाटणार.

पण एका बाजूला केवळ निःशस्त्र लोक उभे आहेत, प्रतिपक्षी शस्त्रास्त्रांनी ठार करीत चालला आहे अशा प्रकारचे एक युद्ध चालले आहे अशी कल्पना करा. असले युद्ध फार दिवस चालणें शक्य

नाहीं असे का ? कारण, की युद्ध करणारे लोकही शेवटी मनुष्यच आहेत त्यांनाही देवानेच उत्पन्न केलेले आहे. त्यांच्यामध्येही आत्मा आहे. अशा स्थितीत देखील विचार करू लागतील.

तथापि सैन्य हे एका यंत्राप्रमाणें आहे. सैनिकांना हुकूम दिले जातात. त्या हुकुमाप्रमाणे तो प्रतिपक्षीयांना ठार मारीत सुटतो. त्याला विचार करण्यास संधीच नसते, अवकाश नसतो. असे लोक बोलत असतात, पण खरी परिस्थिति तशी नसते. पहिल्याच क्षणीं या सैनिकांच्या मनात प्रश्न उत्पन्न होतो की असले युद्ध आम्ही आजपर्यंत कधीच पाहिले नाही. आमच्या पुढे युद्धास उभा असलेला शस्त्राने उलट प्रतिकारच करीत नाही, निःशस्त्रच उभा आहे, मरणाला सिद्ध झालेला आहे, मारण्याला सिद्ध झालेला नव्हे. या प्रकारच्या युद्धाचे शिक्षण आम्ही घेतलेलेच नाही. आम्ही येथून गोळ्या झाडतो, दुसऱ्या बाजूने काहीच प्रतिकार नाही, अशा लोकांना ठार करीत जाणे हा सैनिकांचा धर्म आहे काय ? आम्ही केवळ मारीतच सुटावयाचे आहे काय ? असे हे सैनिक आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना विचारतील. तो अधिकारी आपल्या वरिष्ठाला तोच प्रश्न विचारील. शेवटी अशा तऱ्हेचा प्रश्न पेकिंगमध्येही विचारला जाईल. सर्व जगात त्या वेळी हाहाःकार होईल. हे कसले युद्ध चालू आहे ? हे थांबविलेच पाहिजे. एकत्र बसून वाटाघाटीने या प्रश्नाचा निर्णय करा, असे सर्व जग म्हणू लागेल. याचा परिणाम चिन्यांच्या अंतःकरणावरही होईल. कारण तेही मनुष्यच आहेत.

## हिंसा हा एक नास्तिकवाद

ईश्वरावर आणि त्याचप्रमाणे मनुष्यावर विश्वास ठेवून अहिंसेचा कारभार चालू असतो. हिंसा ही मनुष्याला किंमत देत नाही, ईश्वरालाही किंमत देत नाही. हिंसा ईश्वराच्या सृष्टीचाच नाश करण्यास हपापलेली असते. अणुशक्ति निर्माण झाली आहे. त्यामुळे हिंसा ही केवढी तरी महान शक्ति बनली आहे. तिने सृष्टीतील अखिल मानवकुलाचाच नाश होऊ शकेल. हिंसा म्हणजे महान नास्तिकत्व, भयंकर अमानुषत्व, जंगली असभ्यता, कुसंस्कृति असल्यामुळेच वरील विचार मी आपल्यापुढे ठेवले आहेत.

युद्ध झाले तरी काय ? त्या शक्तीतून पुनःपुन्हा युद्धच होत जाणार. युद्धाची शृंखलाच निर्माण होत राहणार. पण अहिंसक युद्धाने समस्यांचा परिहार होणार. कारण त्यामध्ये उभय पक्षांचा विजय होत असतो. चीनच्या हृदयाचे परिवर्तन झाले तर तो त्याचाही विजयच होय. भारताचा तर विजय होणारच होणार.

## सैन्याने रक्षण होणार नाही

भारताच्या हृदयामध्ये अहिंसाशक्ति सुप्त स्थितीत आहे. तेव्हा त्याने अहिंसक युद्धाची सिद्धता करावी. खऱ्या अर्थाने तोच स्वातंत्र्यरक्षणाचा उपाय होय. आज चालू असलेल्या आमच्या देशरक्षणाच्या क्रमामुळे व पद्धतीने देशाचे रक्षण होणार नाही.

शेवटी आमची सेना नाममात्र आहे. जनतेलाच आपल्या रक्षणाचा विचार करावा लागणार आहे. सैन्यद्वारा रक्षणाचे काम होणार नाही. आपणच आपले रक्षण करून घेतले पाहिजे. जनतेचे रक्षण करण्याचा दुसरा कोणताच मार्ग नाही. जनतेने ही गोष्ट पटवून घेतली तर सैन्याची मग आवश्यकताच राहत नाही. म्हणजे नऊशे कोटि रुपये सैन्या-साठी जमविण्यास जनतेवर लादलेल्या विविध करांचीही आवश्यकता उरणार नाही. मग आमचे सैनिक शेतामध्ये काम करतील नाहीतर कारखान्यां-मधून काम करतील.

## चिन्यांच्या क्रान्तिविचाराला आमचे उत्तर काय ?

हे एक वैचारिक आक्रमण आहे. हे चिन्यांच्या आक्रमणाचे आणखी एक स्वरूप. त्याला आपले उत्तर काय ? चीनचे म्हणणे असे की आमच्यामध्ये चँग-कै-शेकची कारकीर्द होऊन गेली आहे. त्या काळी मोठमोठे श्रीमंत, भांडवलदार आमच्यामध्ये होते. आम्ही भांडवलशाही नष्ट करून टाकलेली आहे. धनसंपत्ति सर्वांना वाटून दिली आहे. आज आमच्यामध्ये मजूर, जनता, कारखान्यांची मालक झालेली आहे. पण भारताची स्थिति काय आहे ? हातांच्या बोटांवर मोजता येतील इतके लोक कोटयधीश झाले आहेत. बाकीची करोडो जनता अन्नाला मोताद झालेली आहे. त्यांना लाज राखण्यालाही अंगावर कापड नाही.

अशा क्रान्तीपासून भारत आपले स्वतःचे कसे रक्षण करुन घेऊ शकेल ? महाबलाढ्य सैन्य सिद्ध करून ठेवण्यानेही त्याचे संरक्षण होऊ शकणार नाही. आमच्या देशात गरीब लोक आहेत, भुकेकेले लोक आहेत, विषमता आहे, शोषण चालूच आहे, अन्याय आहे. सात कोटी लोक अस्पृश्य आहेत ! चीनचे म्हणणे असे की आमच्या देशात अस्पृश्य कोणीही नाही, सगळीच माणसे आहेत. काही उच्च आहेत, काही नीच आहेत, हा प्रकार चीनमध्ये नाही. याला आमचे उत्तर काय ?

## अहिंसक क्रांतीपुढे हिंसक क्रांति निस्तेज वाटते

गांधीजींचा उदय होण्यापूर्वी समाजपरिवर्तनाचे दोनच मार्ग जगामध्ये प्रचलित होते. एक खड्गाच्या हिंसेचा मार्ग आणि दुसरा कायद्याचा मार्ग. गांधीजींनी तिसरा एक मार्ग दाखवून दिलेला आहे. तो प्रेमाचा मार्ग-जनतेचा मार्ग. याच मार्गाने विनोबाजी आज बारा तेरा वर्षांपासून पादचारी होऊन भारतामध्ये भ्रमण करीत आहेत. सरकार काही करो किंवा न करो आपल्यापैकी प्रत्येक नागरिक या मार्गात कोणत्या ना कोणत्या रीतीने आपला कार्यभाग उरकण्यास समर्थ आहे. कोणत्या ना कोणत्या प्रकारची सेवा तो करू शकेल. समाजात प्रेमाची वृद्धि तो करू शकेल. या मार्गाने आम्ही मार्गक्रमण करण्यास अनुकूल व्हावे म्हणून विनोबाजींनी काही कार्यक्रम आमच्यापुढे ठेवले, मार्ग सिद्ध करून ठेवला. भूदान, संपत्तिदान, बुद्धिदान, श्रमदान, ग्रामदान इत्यादि अनेक प्रकारचे विचार आमच्यापुढे ठेवले. कशासाठी ? आमच्यापैकी प्रत्येकामध्ये नवसमाज निर्माण करण्याची कोणती ना कोणती तरी योग्यता आहेच. आमच्यापैकी प्रत्येक जणाने आपल्या योग्यतेनुसार आपल्या वाटणीचे कर्तव्य पार पाडावे अशी शिकवण बिंबवण्यासाठी त्यांनी विविध कार्यक्रम आमच्यापुढे ठेवले आहेत. हा राष्ट्रधर्म म्हणून, मानवधर्म म्हणून, समाजधर्म म्हणून आम्ही मानला पाहिजे.

भूदान म्हणजे सर्वांनी वाटून घेऊन खावे, हे आपण समजून घेतलेले आहे. यामध्ये प्रत्येक भारतीय दुसऱ्या कोणाला तरी हात उचलून काहीतरी देतो. आपल्या देशाचा प्रत्येक नागरिक कोणता ना कोणता तरी त्यातील

कार्यभाग उचलील तर त्यायोगे कितीतरी प्रचंड क्रांती होऊ शकेल. किती भव्य क्रांती ! अशा क्रांतीपुढे चिन्यांची क्रांती निस्तेज आहे. मग, चीनला हिमालय ओलांडून इकडे येण्याची आवश्यकताच उरणार नाही. त्या वेळी चिनी लोक म्हणतील की, आम्ही भूमी वाटून टाकू शकलो हे खरे पण तसे करताना लक्षावधी जमीनदारांना आम्ही ठार केले आहे. पण या भारतीयांनी प्रेमानेच भूमी वाटून घेतली आहे, संपत्तीदेखील प्रेमानेच वाटून घेतली आहे. हा एक अद्भुत देश आहे. येथून आपण काढता पाय घेतला पाहिजे. नाहीतर या क्रांतीचा स्पर्श आम्हांलाही होणारच, आणि आम्ही केलेली क्रांती अस्त पावून सर्वोदयाचा उदय होईल !" याप्रमाणे चिन्यांच्या आक्रमणाला येथे स्थानच राहणार नाही. चीन येथून पळ काढल्याशिवाय राहणार नाही.

अहिंसा, भूदान ही दोन्ही एकाच कार्याची दोन अंगे आहेत. दोन्ही कामे जोडीनेच होणार. भारतामध्ये एकदा निःशस्त्रीकरण होऊ दे, म्हणजे निःशस्त्र भारत अहिंसेने आपले स्वतःचे रक्षण खात्रीने करून घेईल. अहिंसेने तो सामाजिक, आर्थिक क्रांतीही साध्य करून घेईल. त्यावेळीच अहिंसेच्या विचाराची परिपूर्णता होईल.

## गांधीजींनी दिलेला इशारा

" परकीय आक्रमणाला हिंसात्मक मार्गाने तोंड देण्याची सिद्धता केवळ अर्थशून्य आहे. असला मार्ग अवलंबिणे म्हणजे प्रत्यक्ष युद्ध प्रारंभ होण्यापूर्वीच राष्ट्रांची आर्थिक रचना अस्ताव्यस्त करणे. नागरिकांचे जे स्वातंत्र्य युद्धाच्या गंडांतरातून वाचविण्याची आपण इच्छा करतो त्या स्वातंत्र्याला युद्धाला प्रारंभ होण्यापूर्वीच गमावून बसावे लागेल ! राष्ट्रामध्ये युद्धक्षमता, युद्धशक्ति अबाधितपणे वृद्धि पावावी म्हणून सरकारच्या आज्ञा हूं की चूं न करता, न चुकता पालन करणे अत्यंत आगत्याचे आहे, अशा सबबीवर सरकारचे सर्वाधिकारत्व अधिकाधिक पुष्ट होत जाते. नागरिक स्वातंत्र्य संपुष्टात येते. मोठमोठे कारखाने, शहरे, मोठमोठी शस्त्रे तयार करण्याचे कारखाने अस्तित्वात येतात. देशामध्ये सर्वाधिकारी सरकारच अस्तित्वात होऊन बसेल. युद्धशास्त्राचे अनिवार्य परिणाम हे असे आहेत. अहिंसात्मक

प्रतिकार शास्त्रातही खरोखर प्रजाप्रभुत्वाचे रक्षण करावयाचे असेल तर संपूर्ण अहिंसा मार्गच अंगिकृत केला पाहिजे. तसे झाले नाही तर आमचा देश सर्वाधिकारित्वाला बळि पडणारच—जबरदस्तीची सैनिक भरती, त्याच-प्रमाणे प्रजेने आपले हुकूम अक्षरशः पालन करावे म्हणून त्यांच्यावर जबरदस्ती करवण्यासाठी अन्य बलात्कारी उपायाचा अवलंब त्यांना हाती घेणे भाग आहे. राष्ट्रामध्ये केवळ मी एकटाच या अभिप्रायाचा उरलो तरी मी दोन्ही हात वर उचलून देशाला हाच इशारा देईन की :

" भारताने आपल्या सीमाप्रान्ताचे रक्षण करण्यासाठी सुद्धा हिंसा-मार्गाचा त्याग करून अहिंसा मार्गाचे अवलंबन करणेच श्रेयस्कर आहे. भारताने शस्त्र स्पर्धेमध्ये पडणे म्हणजे आत्मघातच करून घेण्यासारखे आहे. "

( महात्मा गांधी : लास्ट फेज,ग्रंथ- भाग २. )

□ □ □

# आक्रमणाला तोंड देण्याकरिता अहिंसक सिध्दता

## गांधीजींचे विचार

( परकीय आक्रमणाचा यशस्वी प्रतिकार अहिंसेने करण्यासाठी, राष्ट्राची आर्थिक तथा नैतिक सिद्धता कोणत्या प्रकारची असावी याविषयी गांधीजींनी केलेले विवेचन खाली देण्यात आलेले आहे. महात्माजींचे आप्तकार्यदर्शी श्री. प्यारेलालजी यांनी लिहिलेल्या 'नव्या क्षितिजाकडे वाटचाल' ( टोवर्डस न्यू होरायझन्स ) नावाच्या पुस्तकातून हे विचार संकलित करण्यात आले आहेत. )

### अहिंसक, आर्थिक पाया

ग्रामोद्योग व गृहोद्योग अहिंसक समाजाचे पाया होत. अशा प्रकारच्या उद्योगांच्या द्वारा स्वावलंबी व स्वयंपूर्ण झालेली ग्रामे किंवा खेडी,

खेड्यांचा समूह, परराष्ट्रांच्या आक्रमणाला अहिंसक शक्तीनेच दीर्घकालपर्यंत अत्यंत चिकाटीने तोंड देऊ शकेल. मोठमोठ्या कारखान्यांवर आधारित केंद्रीकृत अर्थव्यवस्था विकसित करावयाची म्हणजे, आक्रमणकारी राष्ट्रांना आम्हीच आमंत्रण दिल्यासारखे होईल. अशा प्रकारची आर्थिक व्यवस्था सहजरीतीने क्षणार्धात नष्ट करण्यात येईल. इ. स. १९१९ मध्ये ब्रिटिश सेनाधिकारी जनरल डायर याने अमृतसर येथील वीज व पाणी यांचा पुरवठा एका क्षणात बंद पाडला. अमृतसरच्या लोकांचे जीवितच स्थगीत करून त्यांना शरण यावयास भाग पाडले. परंतु स्वावलंबी, स्वयंपूर्ण खेडी हाच ज्याचा आधार आहे अशा राष्ट्राच्या आर्थिक रचनेला या-प्रकारें सहज रीतीनें उद्ध्वस्त करणे शक्य नाही. देशाच्या विस्तीर्ण क्षेत्रामध्ये पसरलेल्या लक्षावधि खेड्यांना एकेकाला उद्ध्वस्त करीत राहण्यास दीर्घ काल लागेल. आणि अशा निर्भीक अहिंसक ग्रामीण जनतेचा विध्वंस करण्याच्या त्या दीर्घ कालावधीमध्ये आक्रमक सर्वाधिकाऱ्याचे हृदय-परिवर्तन होणे असंभाव्य आहे असे नाही. समजा एखादे वेळी अशी ग्रामीण आर्थिक व्यवस्था अस्ताव्यस्त करण्यात आली तरी ती पुनरुज्जी-वित करणे कोणत्याही रीतीने इतकेसे कठीण काम नाही.

## अहिंसक राष्ट्राचा संकल्प

आम्ही दुसऱ्याचे शोषण करणार नाही, आणि दुसरे आमचे शोषण करतील या भीतीला आम्ही थारा देणार नाही. आम्ही शेजारी राष्ट्रांशी प्रेमसंबंध ठेवूनच चालू. आमची सांपत्तिक तशीच बौद्धिक शक्ती आमच्या शेजारच्या मागासलेल्या देशांतील प्रजेच्या कल्याणासाठी आम्ही वापरू. आमच्या राष्ट्राच्या रक्षणाच्या कामी आम्ही या विश्वाच्या, मानवकुलाच्या सौजन्यावर विश्वास ठेवून चालू, अशा प्रकारचा संकल्प करून चालणारे निःशस्त्र राष्ट्र अहिंसक युद्धकला हस्तगत करून आत्मरक्षण करून घेऊ शकेल, या बाबतीत संदेह नको.

या प्रकारे ग्रामोद्योग, स्वावलंबन, स्वदेशीव्रत, शांतिसेना या चिलखतधारी, कल्याणकारी, स्वयंपूर्ण ग्रामराज्याच्या संघाला कोणताही सत्ताधीश, आर्थिक गुलामगिरी असो की राजकीय दास्य असो यांच्या भक्ष्यस्थानी टाकण्याचा संभवच नाही.

## युद्धांची उत्पत्ति

रणांगणामध्ये, युद्धक्षेत्रामध्ये, युद्धाची उत्पत्ति होत नसते. आजची दूषित आर्थिक रचनाच युद्धांचे उगमस्थान होय. अन्य राष्ट्रांच्या शोषणावर आधारित असलेली आजची सामाजिक व आर्थिक रचनाच जागतिक स्फोटक स्थितीचे मूलकारण असते. युद्धच जगातून निर्मूल करण्यासाठी या मूलकारणाचेच उच्चाटन झाले पाहिजे. शोषणरहित अहिंसक समाजरचना हाच योग्य व परिणामकारक उपाय होय. अशा समाजरचनेत कोणत्याही प्रकारच्या असमानतेला, नव्हे सामाजिक अन्यायाला स्थानच असता कामा नये.

## अहिंसक राष्ट्राची मानसिक-नैतिक सिद्धता

एखाद्या वेळी अशा अहिंसक राष्ट्रावर परचक्राचे आक्रमण झाले तरी ते आपल्या अहिंसात्मक असहकारशस्त्राने यशस्वी रीतीने प्रतीकार करू शकते. आम्ही भारतीयांनी केवळ तीस वर्षांच्या अवधीत बलाढ्य ब्रिटिश सत्तेला माती चारलेली आहे. असे असताना आम्ही सैन्य ठेवले नाही तर, शेजारची राष्ट्रे आम्हांला गिळून टाकतील ही भीति आम्हा भारतीयांना कधीही शोभण्यासारखी नाही. अहिंसात्मक असहकाराची कला चांगल्या रीतीने शिकून तसेच प्राणार्पण करण्यासही सिद्ध राहून अहिंसात्मक प्रतिकाराने लढण्यास प्रारंभ करणाऱ्या आमच्या राष्ट्राला गिळून टाकणे ही असाध्य गोष्ट आहे. कदाचित एखाद्या वेळी आम्हांला गिळलेच तर पचविणे मात्र दुर्धर होऊन बसणार. योग्य मानसिक व नैतिक सिद्धतेने प्रारंभ केलेला निःशस्त्र प्रतिकार सशस्त्र प्रतिकारापेक्षा अधिक देदिप्यामान परिणाम घडवून आणील. ती नैतिक-मानसिक सिद्धता तरी कोणती? "आम्हा सर्वांचा देहपात झाला तरी हरकत नाही, पण आम्ही कधीही शरण जाणार नाही. आक्रमणकारांशी कोणत्याही प्रकारचा सहकार करणार नाही." असा अचल निर्धार आम्ही केला पाहिजे. आता, शस्त्रयुद्धामध्येही या प्रकारचा निर्धार—वेळी प्राण देऊ, पण वैऱ्याला शरण जाणार नाही—अवश्य पाहिजेच असतो. असा निर्धार नसेल तर कोणतेही राष्ट्र सशस्त्र युद्धात जय मिळवू शकणार नाही. असे असताना—सशस्त्र युद्धातही या

प्रकारचा आत्यंतिक निर्धार अवश्य असताना--त्यापेक्षा उदात्त, भव्य अहिंसात्मक युद्धाला, अहिंसात्मक प्रतिकाराला आम्ही काय म्हणून मागे हटावे ? सशस्त्र प्रतिकारात असलेली गंभीर न्यूनता म्हणजे, आमच्याकडे असलेल्या शस्त्रास्त्रांपेक्षा अधिक विघातक शस्त्रास्त्रापुढे आमचे काही चालणार नाही, ही भावना होय, तशा प्रसंगी दीन होऊन शरण जाण्याशिवाय गत्यंतरच नाही, ही गोष्ट आजपर्यंत युद्धाचा इतिहास आवर्जून सांगत आहे. पण शस्त्रांवर अवलंबून राहण्याचे टाकून देऊन केवळ आत्मबलावर युद्ध करणाऱ्या जनतेला कोणतीही शस्त्रे-अस्त्रे वांकवू शकणार नाहीत. इतिहासातील अद्वितीय योद्धा नेपोलियन असा सिद्धान्त बोलून चुकला आहे की, " युद्धामध्ये शारीरीक शक्तीचे महत्त्व एक भाग असेल तर नैतिक शक्तीचे महत्त्व तीन भाग असते. " अर्थात् जनतेच्या अचल आत्मनिर्धारापुढे कोणत्याही शस्त्राचे काहीही चालू शकत नाही.

एवढेच नव्हे तर सत्याग्रही व्यक्ति असो किंवा सत्याग्रही राष्ट्र असो, युद्धात मृत्यु पावल्यास ती व्यक्ती किंवा ते राष्ट्र अमर होऊन जाते. अखिल विश्वावर त्याचा प्रभाव पडतो. जगतात त्याच्यामुळेच शाश्वत नैतिक उत्थापन होते. आणखी एक लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे कोणतेही राष्ट्र असो, अहिंसात्मक प्रतिकार यशस्वी रीतीने करावयाचा झाल्यास राष्ट्रातील अखिल जनतेची अहिंसातत्त्वावर आत्यंतिक श्रद्धा असली पाहिजे, अशी आवश्यकता नसते. सशस्त्र युद्धामध्येही प्रत्येक सैनिक युद्धशास्त्रामध्ये पारंगत असत नाही, पारंगत असण्याची आवश्यकताही नसते. त्याचप्रमाणे अहिंसक युद्धात मुख्य नायकाची अहिंसेवर आत्यंतिक श्रद्धा असली पाहिजे आणि जनतेचा आपल्या नायकावर पूर्ण विश्वास असला पाहिजे. अहिंसेचे मूलग्राही सर्व विचार जनतेला समजलेले व पटलेले असले पाहिजेत असे नाही. परंतु अहिंसा–सेनानायकावर अचल विश्वास ठेवून त्याच्या आज्ञा सैनिकांनी शिस्तीनें व पूर्ण अंतःकरणपूर्वक निष्ठेने पालन करण्याचा निर्धार जनतेमध्ये असला पाहिजे. अहिंसात्मक कार्यक्रमातील अहिंसक प्रक्रिया, नियम त्यांनी निष्ठेने पालन केले पाहिजेत.

त्याचप्रमाणे राष्ट्रातील अखिल जनतेने शान्तिसेनेमध्ये भरती होणेही आवश्यक नाही. राष्ट्रांतील करोडो जनतेचे आपल्या आत्मबलाने, आपल्या

अहिंसक तेजाने रक्षण करण्याचा दृढ संकल्प मनाने करणारेच शान्तिसेनेमध्ये समाविष्ट होतील. त्यांनी मात्र आपल्या मालमत्तेवरील, वित्तावरील, प्राणावरील मोहाला तिलांजली दिली पाहिजे. जनतेनेही समाजामध्ये, राष्ट्रामध्ये अहिंसक वातावरण अबाधित राहील अशा तऱ्हेची वागणूक परस्परांशी ठेवली पाहिजे.

## अहिंसात्मक प्रतिकाराचे तीन टप्पे

गांधीजींनी या प्रतिकार योजनेचे तीन विभाग केले आहेत. या योजनेचा अगदी पहिला टप्पा आक्रमण होण्यापूर्वी हाती घ्यावयाचा असतो. आक्रमक आपल्यावर चढून येण्यापर्यंत वाट न पाहता अगोदर आपण आपले प्रेमाक्रमण आरंभले पाहिजे. बंधुप्रेमाने त्या राष्ट्राच्या अडचणी समजून घेऊन त्या राष्ट्राला शुद्ध प्रेमाने जवळ केले पाहिजे.

सन् १९३८ मध्ये खान अबदुल गफारखान ( सरहद्द गांधी ) यांचे आमंत्रण स्वीकारून गांधीजी त्यांच्या प्रान्तात दौऱ्यावर गेले. त्या प्रान्ताची त्यावेळीची एक विशिष्ट आपत्ती म्हणजे, त्या प्रान्ताच्या सीमाभागात राहणारे जंगली लोक दिवसासुद्धा शहरावर एकाएकी चढून येऊन सशस्त्र हल्ले करीत असत. गोळीबार करून जनतेला भिवविणे, त्यांची मालमत्ता नाश करणे, लूटमार करणे, जनतेला, स्त्रियांनासुद्धा उचलून, पळवून नेणे, अमूक इतके रुपये दिले तरच त्यांना सोडून देणे या गोष्टी ते जंगली लोक सतत करीत असत. तीन महिन्यांत असे बावीस हल्ले त्यांनी केले होते. हे सर्व चालत असताना पोलिस लोक निष्क्रिय होऊन बसत असत ! गांधीजींपुढे पीडित शहरांतील या लोकांनी आपापल्या करुण कहाण्या सांगितल्या. गांधी म्हणाले की, “ आमच्यावर राज्य करीत असलेले ब्रिटिश सरकार या जंगली लोकांना आपल्या शस्त्रबलाने ताब्यावर आणण्यासाठी कोट्यवधि रुपये खर्च करते आहे. तथापि ते सर्व निष्प्रयोजक ठरले आहे, असे चालू घटनांवरून स्पष्ट होत आहे. माझा उपाय एवढाच. ते जंगली लोक झाले तरी मनुष्यच आहेत. ते सुद्धा प्रेमाला वश होतातच. त्या लोकांपैकी काही मला आज भेटून गेले आहेत. आमच्यापेक्षा स्वभावाने ते भिन्न आहेत असे काही मला वाटले नाही. ते दारिद्र्यात खितपत

पडलेले आहेत. तुम्ही त्यांना काही उद्योग शिकविले पाहिजेत, त्यांची गरीबी निर्मूल केली पाहिजे, म्हणजे त्यांचे आजचे हल्ले आपोआपच थांबतील.

हेच गांधीजींचे प्रेमाक्रमण. साबरमती आश्रमात चोरी व लूट करणाऱ्या शेजारच्या गुन्हेगार जातीवरही गांधीजींनी हा प्रयोग यशस्वी रीतीने केला होता.

आता आक्रमक राष्ट्राने प्रत्यक्ष आक्रमणच केल्या वेळी आमच्यापैकी शेवटचा मनुष्य जिवंत असेपर्यंत, आत्मबलिदानाला सिद्ध होऊन, निर्भय राहून शान्तचित्ताने, प्रेमभावपूर्वक त्यांच्या हल्ल्याचा प्रतिकार निःशस्त्र होऊन करणे, तसेच त्यांच्याशी संपूर्ण असहकार करणे हा दुसरा टप्पा.

असे केल्यानंतरही त्या आक्रमकांनी देशात घुसून देश आक्रमिल्याच्या परिस्थितीत, त्यांच्याशी सर्वप्रकारे अहिंसात्मक असहकार प्रारंभ करावा. त्याचप्रमाणे विविध प्रकारचा सत्याग्रह करून, त्यांच्या सत्तास्थापनेला प्रतिरोध करावयाचा, अशा रीतीने ( १ ) आक्रमणापूर्वी ( २ ) प्रत्यक्ष चढाई झाल्यानंतर तसेच ( ३ ) देश आक्रमण केल्यानंतर अशा तिन्ही अवस्थेमध्ये तीन प्रकारचा अहिंसात्मक प्रतिकार अवलंबिण्याची गांधीजींची योजना होती.

## आपण कोणती निवड केली पाहिजे ?

आम्हांला केंद्रीकृत सर्वाधिकारी राज्यकारभार व्यवस्था, केंद्रीकृत अर्थरचना, मोठमोठे कारखाने, शस्त्रागार, नवीन शस्त्रे निर्माण करून स्वार्थ, संपत्ति कमावणारे युद्ध कारखानदार पाहिजेत की, अमच्या करोडो जनतेची भुकेपासून मुक्ति, शांति, स्वातंत्र्य, आरोग्य, सर्वांचे समृद्ध जीवन तसेच खरोखरीची मान्यमूल्ययुक्त माननीय संस्कृति पाहिजे. या-विषयाचा निर्णय आपल्याला करावयाचा आहे. जनताराज्य, जनतासुख पाहिजे असेल तर गांधीजींच्या मार्गानेच ते साध्य होईल. त्याविरुद्ध मार्गाच्या मोहात पडल्यास आपण अनेक आधुनिक राष्ट्राप्रमाणे हिंसेच्या डोहात सांपडून हेलकावे खात बसू.

भारतीय लोक अहिंसात्मक असहकाराची कला शिकून घेतील तर आणि ती आचरणामध्ये आणण्याचा त्यांचा निर्धार होईल तर कोणतेहि राष्ट्र त्यांच्यावर आक्रमण:करण्याची इच्छाही करणार नाही, असें मी धैर्यपूर्वक सांगू शकतो, शोषकांना कोणतेही आमिष सांपडणार नाही अशी आमची आर्थिक रचना रचून घेऊ या. हेही एक अहिंसात्मक असहकाराचे अंग होय.

□ □ □

# शान्तिसेना आणि शान्तिसैनिक यांविषयी मार्गदर्शन

## गांधीजी

अहिंसानीतीला अनुसरणाऱ्या राष्ट्रांमध्ये शांतिसेना तथा शांतिसैनिक यांची फारच आवश्यकता असते. शान्तिसेना आणि शान्तिसैनिक यांच्यामध्ये आवश्यक असलेली योग्यता, गुण, तसेच तयारी यांच्याविषयी महात्माजींनी महत्त्वाच्या मार्गदर्शक सूचना वेळोवेळी केलेल्या आहेत. आजच्या परिस्थितीत त्यांचे स्मरण करणे व त्या आचरणात आणणे आपले कर्तव्य आहे. या दृष्टीने त्या सूचनांचे विवरण येथे केलेले आहे.

### एक पाशवी शक्ति दुसरी आत्मशक्ति

हिंसक सेना आणि शान्तिसेनेची संघटना, यांच्या तयारीमध्ये, सिद्धतेमध्ये, महदंतर आहे. हिंसायुद्धांतील सैन्याला शस्त्रास्त्रे व त्यांचे ज्ञान ही तयारी आवश्यक असते. शान्तिसेनेला हे सर्व निष्प्रयोजक. नैतिकबल हेच त्यांचे अमोघ अस्त्र. युद्धसैन्यामध्ये भरती करतांना शारीरीक संपत्ति, उंची, छातीचा रुंदपणा या गोष्टी मुख्य असतात. शान्तिसैन्यामध्ये भरती करताना अध्यात्मिक, नैतिक गुणांनाच प्राधान्य असते. वृद्धामध्ये, स्त्रियामध्ये, बालकामध्ये एवढेच नव्हे एखाद्या शारीरीक रोगाने ग्रस्त

झालेल्यांमध्येही हे नैतिक गुण असणे शक्य आहे. म्हणून शान्तिसेनेमध्ये वृद्ध, युवावस्थेत पदार्पण करणारे, अंध, लंगडे, कुष्ठरोगी देखील भरती होऊ शकतील. अशा लोकांनी भरलेली शान्तिसेनाही विजयी होऊ शकेल. नीट नेम धरून ठार मारण्याचे शिक्षण युद्धसैनिकांना अत्यावश्यक आहे. शान्तिसैनिकालाही पाहिजे असलेले गुण म्हणजे ठार मारण्याचे नव्हे, पण स्वतःचा प्राण देण्याची सिद्धता असली पाहिजे. ही सिद्धता येण्यासाठी कोणतीही तयारी किंवा कोणतेही शिक्षण आवश्यक नसते; केवळ एक मनोनिर्धार असला म्हणजे बस्स !

## सक्रिय अहिंसेला कोणते गुण आवश्यक आहेत ?

याचा अर्थ सत्याग्रही सैनिकाला शारीरीक योग्यतेची आवश्यकताच नाही असा नाही. सत्याग्रही शरीराने, मनाने निरोगी असला पाहिजे. नाहीतर सत्याग्रहीमध्ये आवश्यक असलेले निर्भयता, सहिष्णुता, तितिक्षा हे गुण त्याच्यामध्ये असणारच नाहीत.

शान्तिसैनिकाला एकाच जागी रात्रंदिवस पहारेकरी म्हणून उभे राहण्याचा प्रसंग येईल. ऊन, पाऊस, थंडी यांमध्ये काम करावे लागेल. निबीड अरण्यात यमदूत राहतात तेथे, अग्नि प्रकोप झाला असेल तेथे प्रवेश करण्याचे प्रसंग त्याला येतील. काही न खाता-पिता उपवास करीत, संकटाला न जुमानता, लाठीप्रहार सहन करीत आपल्या कर्तव्यस्थानावर न उभे राहवे लागेल. दंग्याधोप्यांच्या ठिकाणी, गर्दीच्या ठिकाणी घुसून जावे लागेल. अग्निज्वाळांनी पेटलेल्या इमारतीच्या शेघटल्या आतल्या भागात अडकलेल्या लोकांना वाचविण्यासाठी त्याला देवाचे नामस्मरण करीत हलकेच धावत जावे लागेल. पुरामध्ये पडून वाहत जाणाऱ्याचा प्राण वाचवीण्यासाठी अथवा नदीमध्ये बुडून मरणाराला वाचविण्यासाठी त्याला प्रवाहामध्ये एकदम उडी मारावी लागेल. शांतिसैनिकाच्या वाट्याला येणारी अशी कर्तव्ये समर्थपणे पार पाडावयाची असली तर त्याला त्या योग्यतेचे शारीरीक शिक्षण अवश्य आहे. चपल तसेच निरोगी शरीर असणे जरूर आहे.

हटयोगातील काही अनुष्ठाने वरील उद्देशासाठी फारच योग्य, उपयुक्त साधने होत असा गांधीजींचा अभिप्राय होता. या अनुष्ठानांमुळे देहारोग्य,

चपलता, सामर्थ्य तसेच शीतोष्ण सहन करण्याची शक्ति हे गुण उदय पावतात. या अनुष्ठानांचा उद्देशही देहशुद्धि तथा देहशुद्धिमूलक मानसिक नियंत्रण, वैयक्तिक मोक्ष हाच. तथापि शान्तिसैनिकांना आवश्यक असलेले शारीरीक तथा मानसिक दार्ढ्य विकसित करून घेण्यासाठी या अनुष्ठानांमध्ये योग्य व्यवस्था व परिवर्तन करून घेतल्यास सामूहिक अहिंसेच्या तयारीला हे अत्यंत उपयुक्त होईल.

## शान्तिसैनिकामध्ये प्रल्हादाची श्रद्धा असली पाहिजे

देवावर, या विश्वावर नियंत्रण चालविणाऱ्या अध्यात्मशक्तीवर अचल श्रद्धा असणे हा शान्तिसैनिकशिक्षणाचा मुख्य प्राण होय. ही श्रद्धा नसेल तर त्याचे धैर्य ऐत्या वेळी कोलमडेल. ही श्रद्धा असणारा प्रल्हादाप्रमाणे सर्व तऱ्हेने अग्निपरीक्षेतून आणखी अधिक कांतिमय होऊन, तेजःपुंज होऊन बाहेर पडेल. या श्रद्धेच्या बलाने तो अजिंक्य, अजेय होईल. प्रातिपक्षीयांविषयी मनात क्रोध न आणता, सूडबुद्धी न बाळगता, शान्त रीतीने मरणाला तोंड देण्याचे धैर्य, दिव्यसामर्थ्य त्याच्यामध्ये येते.

आपले शरीर मरणाधीन, परंतु आत्मा अमर. कोणतेही शस्त्र त्या आत्म्याचा भेद करू शकत नाही. ही जाणीव शांतिसैनिकामध्ये सदासर्वदा जागृत असली पाहिजे. त्यायोगे त्याला शरीराची पर्वा असत नाही. आपल्यामध्ये असलेले आत्मतत्त्व, आपल्यामध्ये असलेल्या ईश्वराचाच साक्षात्कार करून घेणे हेच त्याच्या जीवनाचे ध्येय. त्यामुळे तो निर्भय झालेला असतो. कारागृहवासाची भीती, आपली मालमत्ता गमावून बसण्याची भीती, अंगविकल होणे अथवा मरण यांची भीती या तीनही भीतींपासून तो मुक्त असला पाहिजे. अध्यात्मशक्तीच्या बलानेच या तीनही भीती तो जिंकतो. १९२०–२२ च्या काळी कायदेभंग आंदोलनामध्ये भारतीयांना तुरुंगाची भीती जिंकण्याचे संस्कार गांधीजींनी प्राप्त करून दिले. १९३०–३२ च्या सत्याग्रह संग्रामात करबंदी इत्यादीने आपल्या मालमत्तेचा मोह फेकून देण्याचा गांधींनी आदेश दिला होता. १९४२ मध्ये 'कर जाव नही तो मर जाव' हा मंत्र देऊन मरणाचे भय जिकण्याची हांक दिली होती.

ही त्रिविध भीती जिंकावयाची असल्यास आपल्या देहापासून भिन्न स्वतंत्र अशी आपल्यामध्येच असलेल्या ईश्वरी तत्त्वावर जिवंत श्रद्धा दृढ असली पाहिजे.

## दुष्ट समजल्या जाणाऱ्यामध्येही आत्मा आहे

विनोबाजी भिंड-मोरेनामध्ये राहणाऱ्या दरवडेखोरांकडे कोणत्या भावनेने गेले? समाजाने तर त्यांच्यावर दरवडेखोर म्हणून छाप मारलाच होता. तथापी विनोबाजींना ते दरवडेखोर असे वाटले नाहीत. अन्याय, विषमता, यांनी दूषित झालेली आजची समाजरचना, प्रतिष्ठित लोकांमध्ये आज घर करून राहिलेला द्रव्यलोभ, वित्तसंग्रह बुद्धी, यापासूनच दरवडेखोर वृत्तींची उत्पत्ती, आपणच यांच्या आजच्या स्थितीला जबाबदार आहोत अशा आत्मीय भावनेने विनोबाजी त्यांच्याकडे गेले. दुष्टांमध्ये, गुंडलोकांमध्ये, हिटलरासारख्या क्रूर सर्वाधिकाऱ्यांमध्ये आत्मा आहे, ईश्वरी अंश आहे, अशी श्रद्धा शांतिसैनिकामध्ये दृढपणे मूळ धरलेली असली पाहिजे. आपण या श्रद्धेने त्यांच्याकडे जाऊ तर त्यांच्यामध्ये असलेला दैवी अंश खात्रीने ओ देईलच देईल. लक्षावधी रुपये खर्च केले तरी सरकारला वश न झालेले दरोडेखोर, यांनी शस्त्रे ठेवून स्वतःला विनोबाजींपुढे आत्मार्पण करून घेतले.

जर्मनीमध्ये हिटलर असो, त्याचा नाझी पक्ष असो, डोके वर काढण्याचे कारण काय? इंग्लंड व त्याची मित्र राष्ट्रे यांनी पहिल्या महायुद्धानंतरही जर्मन प्रजेवर क्रूर अत्याचाराचा भडिमार केला. एकच उदाहरण द्यावयाचे झाल्यास युद्ध संपल्यानंतरही या राष्ट्रांनी त्यांच्या समुद्र मार्गांची कोंडी करून त्यांचे दिग्बंधन करून जर्मन मुलाबाळांना, स्त्रियांना, पुरुषांना, अन्नसामुग्री मिळणार नाही असे करून त्यांना उपवासी मरण्याची पाळी आणली. जर्मन नायकांचा अनेक प्रकारे अपमान केला. यायोगे जर्मन सामान्य प्रजेचे मन विकृत झाले असल्यास त्यात आश्चर्य काय? बुद्धीमध्ये विकृती उत्पन्न झाल्यानंतर मनुष्याला कोणत्याच गोष्टीची खंत वाटत नाही असे होते. पण हिटलरमध्ये, नाझी लोकांमध्येही आत्मा होता. त्याचे एक उदाहरण म्हणजे, युरोपात क्वेकर या नावाचा एक खिस्ती संघ आहे. या

क्वेकर पंथाचे लोक अहिंसावादी होते. त्या संघाची तत्त्वे पुष्कळ अशी गांधीजींच्या तत्त्वाशी जुळती आहेत. हिटलर असो किंवा त्याच्या नाझी पक्षांचे घटक असोत, जर्मनीत असलेल्या अन्य अनेक धार्मिक पंथांना मात्र त्यांनी त्रास दिला असला तरी या क्वेकर पंथाच्या लोकांच्या उसाभरीलाच ते गेले नाहीत. त्याचेही कारण एवढेच. वर सांगितल्याप्रमाणे इंग्लंड आणि त्याची मित्र राष्ट्रें जर्मन अर्भकांना स्त्रियांना उपवासाच्या भक्ष्यस्थानी लोटीत असतानाही क्वेकर प्रजेने कोणत्याही प्रकारचा धर्मभेद, शत्रुमित्र-भेद मनात न आणता या जर्मनांना मदत व सहकार मिळवून दिला.

सारांश आपल्यामध्ये जसा आत्मा आहे, ईश्वरी अंश आहे तसाच दुष्टांमध्ये, क्रूरांमध्ये, गुंडपुंड असे दिसणाऱ्यांतहि आपल्याला दिसत नसला तरी ईश्वरी अंश आहेच आहे. आम्ही द्वेष, असूया वगैरे तिरस्कारभाव टाकून देऊन त्यांना प्रेमादराने जवळ केल्यास त्यांचा आत्माही खात्रीने ओ देतो. ही आध्यात्मिक दृष्टी शान्तिसैनिकांमध्ये रुजलेली असली पाहिजे नारदमुनींनी वधीक बेरडाकडे ज्या शान्त वृत्तीने, दैवी प्रमाने पाहिले तेच प्रेम, तीच प्रेमदृष्टी शान्तिसैनिकाने स्वतःमध्ये विकसित करून घेतली पाहिजे. परिस्थिती संस्काराने, अत्याचारात सापडल्याने मनुष्यामध्ये दुष्कृती, क्रूरता, येत जाते. पण त्याच्या बुडाशी शुद्ध आत्मा आहेच आहे. थोडक्यात सांगावयाचे तर या विश्वाचे नियंत्रण करणारी, चालवणारी एक सत्शक्ती आहे, त्रिकालाबाधित सत्संकल्पाने जगातील प्रत्येक क्रिया चालवली जात असते. तिच्या इच्छेशिवाय एक गवताची काडीही हालू शकत नाही, त्याचप्रमाणे हे परमात्मतत्त्व सर्वांच्या हृदयातही आहे, बेरड वाल्मिकी होऊ शकतो. त्याचप्रमाणे शरीर विनाशी, पण आत्मा अविनाशी हे सनातन सत्य आहे. बाकी सर्व क्षणभंगुर होय. ही द्विविध आध्यात्मिक श्रद्धाच शान्तिसैनिकामध्ये असावयास पाहिजे.

शान्तिसैनिकाला उत्तम शिक्षण मिळण्याचे क्षेत्र म्हणजे दंगा, गडबड गोंधळ चाललेली स्थळे, गल्ल्या-रस्त्यात चाललेले तंटे आणि एखादे खूळ उत्पन्न झालेले प्रसंग हे होय. दोघांचे भांडण चाललेले पाहून तेथून आपल्या पायाला बुद्धी शिकवणारा नेभळा भितरा मनुष्य शान्तिसैनिकच नव्हे. अशा

प्रसंगात शान्तिसैनिक गप्प उभा राहून मजा पहात बसणार नाही तर त्या धक्का-बुक्कीमध्ये स्वतः पडून ते शान्त करण्याच्या प्रयत्नात आपला प्राणही संकटात घालून घेईल. शान्तिदलाच्या सदस्यानेही वाकड्या व आड रस्त्याने जाणाऱ्यांवर, गुंड लोकांवरही प्रेमाचा पाऊस पाडला पाहिजे- तितक्या प्रमाणात त्याच्यामध्ये अहिंसेचा विकास झालेला असला पाहिजे. याच्यासाठी शान्तीच्या काळात, दीर्घप्रयत्न करण्यासाठी अत्यंत समतोल मनाने रावावे लागेल. समाजातील गुंड म्हणून म्हटले जाणाऱ्या बांधवांशी संपर्क वाढविला पाहिजे. त्यांचा परिचय करून घेतला पाहिजे. आपल्या निःस्वार्थ सेवेने त्यांच्या आजूबाजूच्या लोकांचे प्रेम संपादन केले पाहिजे. त्यांच्याशी अपरिचित राहता कामा नये. तोही कार्यकर्त्यांपैकी कोणाशीहि अपरिचित असता कामा नये. समाजातील कोणत्याही वर्गाचा गुंड असो, उचल्या असो, आपल्या साहचर्याला तो अयोग्य आहे असे सैनिकाने मानता कामा नये. अन्यायामुळे व विषमतेमुळे प्राप्त झालेल्या सामाजिक परिस्थिती-तूनच गुंडाची उत्पत्ती होते. समाजच त्याच्या दुर्वतनाला जबाबदार आहे. गुंड लोकांचे अस्तित्व हे समाज पुरुषाला जडलेल्या रोगाचे लक्षण आहे. रोगाचे मूळ बीज शोधून काढले पाहिजे. म्हणजे त्या रोगाचे निर्मूलन करणे सुलभ रीतीने साध्य होईल.

## शांतिसेनानायकाची नीती

"वन स्टेप इनफ फॉर मी!" "–एकच पाऊल मला पुरे आहे." हीच शान्तिसेना नायकाची नीती असते.

शांतिसेनेचे नायक अधिकारी, प्रत्यक्ष एखादा प्रसंग उत्पन्न होण्यापूर्वीच आपली विस्तृत कार्ययोजना सिद्ध करून ठेवणार नाही. "वन स्टेप इज इनफ फॉर मी" –"एक पाऊल मला पुरे आहे." या नीतीला अनुसरून शान्तिसैनिकाने वागावे. त्या त्या प्रसंगाला त्याचा अंतरात्मा त्याला प्रकाश दाखवील. हीच त्याची श्रद्धा. म्हणून अंतरात्म्याचा ध्वनी नेहमी ऐकू येईल, अशा रीतीचे आपले जीवन तो व्यवस्थित राखील. चित्ताची समता सदासर्वदा तो पालन करील. शान्त, दान्त असा तो राहील. हिंसक सैन्याच्या सेनापतीपेक्षा त्याच्यामध्ये अधिक प्रसंगावधान,

अधिक निर्णयशक्ती असली पाहिजेत. तो प्रत्युत्पन्नमती असला पाहिजे. हे गुण यावयाचे असतील तर सत्य–अहिंसेला साजेसे त्या त्या प्रसंगाला आपले पुढचे पाऊल कोणते असावे, याचा निर्णय करावयाचा असेल तर, त्याची जीवनधाराच सत्य-अहिंसेचे प्रतिबिंब झाली पाहिजे. या प्रकारचा संयम व या प्रकारचे अनुशासन यांनी आपल्या जीवनाला जागृतपणें वळण दिले पाहिजे हिंसक सैन्यामध्ये, त्यांच्या त्यांच्या दर्जाप्रमाणे, त्यांच्या त्यांच्या योग्यते-प्रमाणे कमी अधिक वतन सेनाधिकारी घेत असतात. उलट शान्तिसेनेचा नायकही आपला त्याग, तपस्या, संयम यामुळे सर्वांच्या मान्यतेला पात्र होतो. शांतिसैनिक स्वयंस्फूर्तीने आपल्या अधिकाऱ्यांशी नम्रपणे वागत असतात.

## शान्तिसेनेची शिस्त

शिपायांची शिस्त, म्हणजे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नियंत्रणामुळे आलेली वाह्य शिस्त होय. आपल्या परेडच्या ( ड्रिल ) स्थळापासून बाहेर पडल्यानंतर शिपाई लोक कितीतरी उच्छृंखलपणे, गैरशिस्तपणे वर्तन करतात. ही सर्वांच्या अनुभवाची गोष्ट आहे. शान्तिसैनिकही शिस्त पालन करतात. परंतु ही शिस्त त्यांच्यावर कोणीही बाहेरून लादलेली नसते. तथापी तो आपले जीवनच आत्मसंयमनाने घालवीत असल्यामुळे त्यांच्या जीवनात शिस्त त अनुशासन सहजच्च प्रतिबिंबित होते. युद्धसेनेमध्ये वरिष्ठांचे नियंत्रणतंत्र बंद होताच सर्वच बेशिस्त होऊन जाते. शान्तिसेनेमध्ये असे कधीही होणार नाही, होऊ नये. तसा प्रसंग आला तर प्रत्येक शान्ति-सैनिकाला आपला स्वतःचा नायक व्हावे लागते. सर्व शान्तिसैनिक एकाच तत्त्वाने, एकाच श्रद्धेने प्रेरित झाले असल्यामुळे त्यांच्यामध्ये परस्पर सहकार सहयोग, काहीही अधिक प्रयत्न न करता सहजपणे साध्य होत असतो. अशा प्रकारची संघटना मोडून टाकणे कोणत्याही बलाढ्य शक्तीला शक्य नाही. गांधीजींनी केलेल्या अनेक सत्याग्रह आंदोलनामध्ये अनेकदा मुख्य नायकांनाच तुरुंगात घालण्यात आले. कॉंग्रेस संघटनाच बेकायदेशीर म्हणून दाबून टाकल्या गेल्या. अशा परिस्थितीतसुद्धा आंदोलन बाह्य सूत्र-चालक नसतानाही स्वयंचलित होऊन स्वयंनियंत्रित होऊन स्वयंस्फूर्तीने चालू राहिले. ठिकठिकाणी कधीही न दिसलेले नवीन नवीन पुढारी

उत्पन्न झाले. काही प्रसंगी प्रत्येक सत्याग्रही आपणच आपला नायक किंवा पुढारी झाला. देशभर एक अदृश्य संघटना काम करू लागली.

## अहिंसक संघटनेचे रहस्य

जग हे एक विशाल, विस्तीर्ण मंदिर असल्याप्रमाणेच आहे. या मंदिराच्या घुमुटाच्या मार्गाने, मंदिराच्या ठीक मध्यावर प्रकाश पडत आहे. विश्वातील सर्व लोक एकत्रित यावयाचे असतील तर एका बाजूला वळवावयाचे असतील तर त्यांनी एकमेकांना हुडकत जाण्याचे कारण नाही. सर्वांनी प्रकाशाच्या दिशेने वाटचाल करीत गेल्यास सहजपणे सर्व एकत्रित येतील, असे महर्षी टॉलस्टॉय यांनी सांगून ठवले आहे. सत्य-अहिंसेच्या प्रकाशाकडे वाटचाल करणारे ते कोठेही असले तरी त्यांच्या सर्वांमध्ये सहजपणे एक अदृश्य, अभेद्य, सहकारसंघटना आपोआप दिसून येते. अर्थात् शान्तिसेना बाह्यसंघटनेवर अवलंबून असत नाही.

मिलिटरी व्यवस्था तथा शान्तिसैनिकांची व्यवस्था यांच्यामध्ये काही विषय सामान्यतः समान आहेत. संगीत, कवाईत, शिबिरजीवन, स्काउटिंग, प्रथम-चिकित्सा, पीडा, संसर्गजन्य रोग यांचे नियंत्रण करण्याची कला महापूर, भूकंप इत्यादी नैसर्गिक प्रकोपांमुळे येणाऱ्या आपत्तींमध्ये परिहाराचे काम हाती घेणे. असे विषय मिलिटरी आणि शान्तिसेना या दोन्हींना समान आवश्यक आहेत. सामूहिक संगीत, सामूहिक प्रार्थना ही शान्तिसेनेच्या शिक्षणक्रमातील आवश्यक अंगे होत. स्वतः सेवाकार्य करीत असलेल्या प्रदेशातील भाषेमध्ये निष्णात होण्याची वृत्ती शांतिसैनिकामध्ये असलीच पाहिजे.

## शान्तिसैनिकाची मनोभावना कशी असली पाहिजे ?

मिलिटरी सैनिकांचा गणवेश ( युनिफार्म ) आणि शान्तिसैनिकाचा गणवेश यामध्ये अंतर असते. मिलिटरी पोशाख झगझगीत असावा लागतो. शान्तिसैनिकाचा पोशाख साधा, तसाच गरिबांच्या पोशाखाला साजेसा विनयद्योतक असला पाहिजे.

मिलिटरी वृत्ती प्रतिस्पर्धी वैऱ्याचा संपूर्णनाश इच्छिते. शान्तिसैनिक विरोध्यामध्ये सद्बुद्धि उत्पन्न होवो, अशी देवापाशी प्रार्थना करतो. प्रति-

पक्षाचा संपूर्ण पराजय होवो या भावनेला शान्तिसैनिक कधीही आपल्या हृदयामध्ये स्थान देणार नाही. शान्तिमय युद्धाच्या शेवटी सत्याग्रही आणि त्याचा प्रतिस्पर्धी दोघानाही हृदयैक्य व आनंद यांचा अनुभव आला पाहिजे, आम्ही दोघांनी परस्पर सहयोगाने न्याय व सत्य यांचे दर्शन घेतले, सत्याची प्रतिष्ठापना करण्यासाठी आम्ही दोघे समर्थ झालो असा सात्त्विक आनंद दोघांनाही अनुभवावयास मिळाला पाहिजे.

## अहिंसा सेवेमध्येच परिणत झाली पाहिजे

अहिंसा म्हणजे निष्क्रियता नव्हे. अहिंसा म्हणजे शुद्ध प्रेम, सद्भाव. आपल्यावर प्रेम करणाऱ्यावर प्रेम करणे प्रेम नव्हे. तो केवळ बाजारातील देवघेवीचा व्यवहार होय. प्रेम प्रत्यक्ष सेवेमध्ये दिसून आले पाहिजे. जातीय ऐक्य, अस्पृश्यतानिवारण, खादी, मद्यपानप्रतिबंध ग्रामनिर्मलीकरण इत्यादी विधायक कार्यक्रम ही सक्रिय प्रेमभाव वृद्धिंगत करण्याची साधने होत. विधायक कार्यक्रमामध्ये गुंतून राहण्यानेच सक्रिय, प्रभावी अहिंसा शांतिसैनिकांमध्ये विकसित होत असते.

## वानराकडूनही देव कार्य साध्य करून घेतो

वर विवरण केलेल्या या नैतिक अध्यात्मिक गुणांनी सुसज्ज असलेली लहानशीच शांतिसेनाही कालानुक्रमाने विशाल होऊन वृद्धिंगत होत असते. दिसावयाला लहान म्हणवणाऱ्या लोकांना निमित्त करून महान् कार्ये साध्य करून घेणे हे परमात्म्याच्या कार्यकौशल्याचे वैशिष्ट्य होय. पण हे नैतिक तेज नसलेली सेना वाटेल तितकी मोठी असली तरी कोणत्याही प्रकारचा परिणाम करू शकणार नाही.

□ □ □

वि:
नों दि:

# अहिंसाशक्तिवर आणखी प्रकाश

## काही प्रत्यक्ष घडलेल्या घटना

सन १९४७ मध्ये घडलेली घटना. आमच्या देशाचे दोन तुकडे झालेले होते: हिंदुस्थान, पाकिस्तान. हिंसा-प्रतिहिंसा यांनी चोहोकडे विशेषत: उत्तर हिंदुस्थानात वर डोके काढले होते. केवळ व्यक्ती व्यक्तींचिच खून नव्हे, परधर्मीयांची अखिल जातच निर्नाम करण्याच्या गोष्टी चालल्या होत्या ! क्रूरता परमावधीला जाऊन पोचली होती. मानव हा मानव राहिला नव्हता. सर्वच साक्षात् पशु झाले होते. त्या काळी गुंड लोक टोळीटोळीने गावोगाव हिंडत होते. सबंध गावालाच 'तुम्ही धर्मांतर केले पाहिजे तरच जिवंत रहाल' असे सांगत होते. स्त्रियांना, मुलींना, उचलून घेऊन जात होते. कोठे कोणी प्रतिकार केल्यास त्यांना हिंसेच्या हाल-हाल होण्याच्या भक्ष्यस्थानी पडावे लागत होते. त्यामुळे बाकीचे सर्व भीतीग्रस्त झाले पाहिजेत हा त्यात उद्देश होता.

पश्चिम पंजाबातील एक गाव. तेथे शीख लोकांची वस्ती. गुंड लोकांची एक टोळी तेथे पोचली. त्यांनी सर्व गावाला वेढा घातला. त्या गावाच्या लोकांना त्यांनी सांगितले की, "तुम्ही सर्व मुसलमान होऊन तुमच्या स्त्रियांना आमच्या स्वाधीन करा. त्या यापुढे आमच्या होऊन राहतील." स्त्रिया ते सर्व ऐकत होत्या. त्यांनी सांगितले की, "ठीक आहे; पण प्रथम एकदा थोडे आमच्या गुरुद्वारामध्ये जाऊन येतो; तेथे एक नवीन विहीर नुकतीच बांधवलेली आहे. त्या विहिरीचे, पाणी आम्ही अजून प्यालेलो नाही. तेथे जाऊन थोडे पाणी पिण्यास प्रार्थना करण्यास परवानगी द्या." या गोष्टीस त्या गुंड लोकांनी कबुली दिली. त्या सर्व स्त्रिया तेथे जाऊन प्रार्थना करू लागल्या. थोड्या वेळातच बाहेर असलेल्या गुंड-लोकांनी ओरडण्यास सुरुवात केली की, "फार उशीर झाला; लौकर बाहेर या." त्या वेळी त्या स्त्रियांमधील एका वृद्ध स्त्रीने उत्तर दिले की, "तुमच्या-पैकी ज्यांना धैर्य असेल त्यांनी आत येऊन आम्हाला उचलून घेऊन जावे."

असे सांगत असतानाच त्या वृद्ध माईने विहिरीत उडी घेतली. तिच्यानंतर तेथे असलेल्या इतर ७-८ महिलांनी विहिरीत उड्या घेतल्या. संबंध विहीरच प्रेतांनी भरून गेली! केवळ एक मुलगी जिवंत राहिली. हे सर्व पाहून, ते गुंड लोक अवाक झाले; स्तंभित झाले. आणि त्या गावातील जनतेच्या उसाभरीला न जाता ते गुंड लोक परत चालते झाले. धर्मांतर करण्याच्या वार्तेकडेही ते गेले नाहीत. त्या महिलांनी सत्याग्रहाचे नावही ऐकलेले नव्हते. शांतिसेना म्हणजे काय आहे, हे समजून घेण्याच्या पायरीलाही त्यांची बुद्धी शिवलेली नव्हती. परंतु त्यांनी आपल्या आत्मबलिदानांनी आपल्या पुरुषांचा धर्म व प्राण वाचविले, त्यांचे मानवत्वही रक्षण केले व ही घटना कोणत्या वेळी घडून आली? तर धर्मांधता शिखराला पोचली होती, परधर्मीयांना ठार करणे आपले धर्मकर्तव्य आहे असे लोकांना वाटत होते तेव्हा. हिंदु, मुसलमान, शीख कोणीही त्या वेळी क्रूरतेमध्ये मागे राहिलेला नव्हता. "आमच्या धर्माच्या लोकांना त्यांनी ठार केले. त्यांना आता ठार करणे आमचे परम कर्तव्य आहे" असे लोक समजत होते. असे वातावरण चोहोकडे पसरलेल्या प्रसंगी या महिलांनी आपल्या बलिदानाने आपल्या पुरुषांचे रक्षण केले. हा काही लहान चमत्कार नव्हे !

## पशुजगतामधील एक घटना

आत्मबलिदानाचा प्रभाव पशुपशुमधील संबंधांमध्ये कसा होतो हे एक रशियन लेखक आपल्या डोळ्यांसमोर प्रत्यक्ष झालेली घटना वर्णन करून सांगतो. एकदा तो आपल्या बागेमध्ये फिरत होता. एक पक्षी आणि त्या पक्ष्याचे पिलू थंडीने पीडित होऊन असहाय स्थितीमध्ये तेथेच पायवाटेवर पडलेले त्याने पाहिले. ते दोन्ही पक्षी उडण्यास असमर्थ झाले होते. त्या पक्ष्याच्या पिलावर तेथे असलेल्या एका कुत्र्याने झडप घातली. त्या पिलाची आई त्याच्या रक्षणासाठी त्या कुत्र्याला मारून प्रतिकार करण्याचा प्रयत्न करू लागली. परंतु त्याचा काहीच परिणाम झाला नाही. मग ती आपल्या चोचीने प्रहार करू लागली. त्याचाहि काहीच परिणाम होऊ शकला नाही. मग तिने एकदम उडून, त्या कुत्र्याच्या तीक्ष्ण दांतांमध्ये आपले शरीर समर्पण करून टाकले! कुत्र्याने क्रोधाविष्ट होऊन, त्या पक्षिणीला फाडून

तिचे तडफडणारे शरीर एका बाजूला फेकून दिले. परंतु ते कुत्रे एवढ्या-वरच थांबले. त्या पक्ष्याच्या पिल्लाच्या बाजूलाही ते गेले नाही. तेथून ते निघून गेले. या प्रसंगामध्ये काही गोष्टी उठून दिसतात. त्या पक्षिणीमध्ये कोणतेही सामर्थ्य नव्हते. असे असूनही तिने तिच्यापेक्षा अधिक बलिष्ठ प्राण्याला तोंड दिले. त्या कुत्र्याला एक थेंब रक्त येण्यासारखे केल्यास कुत्र्याने तिलाच नव्हे तिच्या पिल्लासही ठार केले असते, पण त्या आईने शेवटी आपले शरीरच बळी दिल्यामुळे त्या कुत्र्याच्या क्रोध आपोआप शमन पावला.

## काँग्रेस मंत्र्यांना गांधीजींची कानगोष्ट

सन १९३७ नंतर हिंदुस्थानाच्या इतिहासात एक नवीन अध्याय सुरू झाला. ब्रिटिश सरकारने आमच्या प्रांतीय सरकारांमध्ये भारतीयांना काही मर्यादेपर्यंत स्वायत्ततेचे अधिकार दिले. असे अधिकार मिळताक्षणीच हिंदु-मुसलमान यांच्यामधील भांडणांना ऊत आला. या कलहांना प्रचोदन देणारे दुसरेच लोक होते. ते कलहाग्नी प्रज्वलित करून दूरच उभे होते. अग्नीने पेट घेतला. त्याप्रसंगी एकदा मुंबई सरकारात गृहमंत्री असलेले श्री. मुरारजी देसाई गांधीजींकडे जाऊन म्हणाले की, “ असे दंगे उठले तर आम्ही काय करावे ? ” गांधीजी म्हणाले: “ तेथे जाऊन, पेटलेल्या दंग्याच्या ज्वालेमध्ये उडी घ्या. त्यात मरण आले तरी पर्वा नाही. शेवटी आम्हा सर्वांना मरावयाचेच आहे. हिंसेच्या युद्धात केवळ शिपाईच मरतात असे नाही, सेनानायकही मरतात. अहिंसेच्या धर्मयुद्धात केवळ शांति-सेवकांनी बलिदान करण्याने जय मिळणार नाही, मुख्य नायकालाही बलिदान करावे लागते. ”

नंतर त्या वेळेचे मुख्य मंत्री बाळासाहेब खेर यांनी गांधीजींना विचारले की, “ आमच्या मंत्र्यांनी आपल्या स्थानाची जबाबदारी कशी सोडून द्यावी, त्यायोगे देशामध्ये अराजकता पसरणार नाही काय? ” गांधीजींनी त्यांना समजावून दिले: “ आम्ही जनतेला सांगावे की आपण आम्हांला निवडून पाठविलेत, परंतु काँग्रेसने अहिंसानीती स्वीकारलेली आहे, म्हणून शान्तीचे पालन करण्यामध्ये तुम्ही सहकार

करीत न जाल तर, आम्ही हे मंत्रिपद सोडून देऊ, या संदर्भात पुन्हा निवडणूक होईल त्या वेळी तुमचे चारित्र्य तेजस्वी होऊन चमकेल. वेगळ्या लोकांना निवडून द्यावयाचे असेल तर लोकांनी संतोषाने तसे करावे. पण त्यांनी तुम्हांलाच निवडल्यास त्यांनी तुमचे म्हणणेच ऐकिले पाहिजे." ब्रिटिशांनी पोसलेल्या पोलिसांचा उपयोग न करता आम्ही जातीय दंगे शान्त केलेच पाहिजेत. तसे करीत असतांना आमचे बलिदान होईल, आम्ही मरू. आम्ही असे वर्तन न केल्यास आज हिंदु-मुसलमानात चालू असलेले दंगे सबंध राष्ट्रात, यादवी माजवतील व राष्ट्राच्या दोन भागांमधील युद्धात त्याचे रूपान्तर होईल. मग ब्रिटिशांना तुम्ही येथेच राहून आमचे रक्षण करा असे सांगावे लागेल. नाही तर देशाचे दोन तुकडे होण्याचा प्रसंग येईल."

(हे १९३७ मधले गांधीजींच्या तोंडून निघालेले भविष्य; आणि आमच्या अश्रद्धेमुळे शेवटी हे कटु भविष्य खरे ठरले.)

१९३७ मध्ये प्रान्तीय सरकारांचे अधिकार कॉंग्रेसच्या हातात येताक्षणी गांधीजींनी सर्वांनाच प्रश्न विचारला होता की, "तुम्ही ब्रिटिश पद्धतीनेच राज्यकारभार चालविणार की त्यांची राज्यकारभार चालविण्याची पद्धती बदलून कारभार चालविणार?" तुम्ही ब्रिटिशांच्या पद्धतीमध्ये परिवर्तन न केल्यास आमच्या प्रजेला 'अधिकार मिळून काहीही लाभ झाला नाही असे वाटेल' असे गांधीजी म्हणाले. आजपर्यंत कोठेही शांतता-भंग झाल्यास ब्रिटिश सत्ताधारी तेथे पोलिसांना पाठवीत असत. पण गांधीजी म्हणाले की, "या पोलिसांवर विश्वास ठेवू नका. आज तुम्हांला सलाम करणारे हे पोलीस उद्या तुमच्या हातात बेड्या ठोकतील. त्यांच्यावर अवलंबून राहणे घातक ठरेल."

(प्यारेलालजी यांच्या लेखांमधून)

□ □ □

मराठा ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम ........ वि:
नोंद दि:

# अहिंसात्मक प्रतिकार हाच व्यवहार्य

## मार्जरी साइक्स

चिनी आक्रमण सुरू झाल्या दिवसापासून "भित्रेपणापेक्षा हिंसात्मक युद्ध करणेच अधिक चांगले" हे गांधीजींचे वाक्य, लोकनेते, वृत्त-पत्रकार उसंत न घेता उद्धृत करू लागले आहेत. या दोन्हींशिवाय अन्य मार्गच नाही, अशी भावना वाढू लागली आहे. गांधीजींनी स्वतः अवलंबिलेल्या आणि आम्हांसही अवलंबिण्यास सांगितलेल्या तिसऱ्या मार्गाचा कोणी उल्लेखही करीत नाही ! बलशाली असणारांनीही अहिंसेचेच अवलंबन केले पाहिजे, हा तिसरा मार्ग, आमच्यासारखा एकच 'आंतर राष्ट्रीय पेचप्रसंग' गांधीजींच्या जीवनात आलेला होता. सन १९४२ मध्ये जपानी सैन्य भारताच्या पूर्व भागात आक्रमण करण्याचा संभव दिसत होता. त्यावेळी आपण काय करावे याविषयी गांधीजींनी निःसंदिग्ध शब्दांमध्ये असे सांगून टाकले होते की, "शस्त्रास्त्रांनी प्रतिकार करू नका. ते ( जपानी ) आले तर निःशस्त्र होऊन त्यांना तोंड द्या. त्यांना काय पाहिजे, काय नको ते विचारा, त्यांना भूक लागली असल्यास जेवण द्या. तहान लागली असल्यास पाणी द्या. ते तुमचे पाहुणे, शत्रू नव्हेत हे स्पष्ट करा. तुमचा राज्यकारभार तुम्हीच चालू ठेवा. त्यांच्या शासनापुढे मान तुकवू नका. प्राण गेला तरी त्यांच्या अन्यायी आज्ञा पालन करू नका."

हा तिसरा मार्ग अव्यवहार्य म्हणून दुर्लक्षित होत आहे. तथापी हा मार्ग आजपर्यंत कोणीही आचरून न पाहिलेला असा अगदी नवा मार्ग नव्हे. अहिंसा तत्त्वावर विश्वास असलेले या मार्गाने गेलेले आहेत. प्राप्त परिस्थितीत अहिंसात्मक प्रतिकार हाच एक परिणामकारक उपाय आहे, अशी खात्री पटलेले लोक याच मार्गाने गेलेले आहेत.

युरोपच्या लोकांनी पहिल्या प्रथम अमेरिकेमध्ये वसाहत केल्या वेळी तेथील मूळनिवासी रेड इंडियन्स जोराचा प्रतिकार करीत होते. त्यांच्याशी

गोरीला पद्धतीनेच युद्ध करीत होते. केव्हाही सशस्त्र होऊनच संचार करावा लागत होता, शेताभोवती घट्टमुट्ट भिंती बांधून संरक्षण करून घ्यावे लागत होते.

तथापी वसाहत करणाऱ्या लोकांमध्ये एक वर्ग अहिंसा सिद्धान्तच धर्मसिद्धान्त म्हणून चालणारा होता. ते हातात शस्त्र धरीत नव्हते. घराभोवती संरक्षक भिंती बांधित नव्हते. एके दिवशी खिडक्या-दरवाजे सतत उघडे ठेवून ईश प्रार्थनेमध्ये ते गढून राहिले. बरोबर त्याच वेळी रेड इंडियन्स यांनी सशस्त्रे टोळीने येऊन आक्रमण केले. उपसलेल्या तरवारी-भाले यांनी मंदिराचे दरवाजे उघडून ते आत घुसले. तथापी प्रार्थनेला वसलेले कोणीही थोडेसुद्धा हलले नाहीत. आयांनी आपल्या अर्भकांना घट्ट पोटाशी आवळून धरले होते. सर्व स्त्री-पुरुषांनी आपली देवता–प्रार्थना तशीच पुढे चालू ठेवली. रेड इंडियन्सच्या टोळीचा नायक दरवाजात उभा राहून आश्चर्यचकित होऊन हे दृश्य पहात राहिला ! त्याचे पाठीराखे खिडक्यां-तून डोकावून पाहू लागले. एकही शस्त्रास्त्र, सरक्षण साधन, वैराची भावना त्यांना दिसली नाही. बराच वेळ शान्तपणे निरीक्षण करीतच ते उभे राहिले. शेवटी त्या टोळीच्या नायकाने आपल्या लोकांना सूचना केल्याप्रमाणे त्यांनी सर्वांनी आपल्या हातातील तरवार, भाले जमिनीवर उतरून ठेवले. घरामध्ये प्रवेश करून बसून त्यांच्या बरोबर प्रार्थनेमध्ये भाग घेऊ लागले. भित्रे नसलेल्या बलशाल्यांच्या अहिंसेचा प्रभाव प्रत्यक्ष दिसून आला.

अशाच प्रकारची आणखी एक घटना डेन्मार्कमध्ये घडून आली. डेन्मार्क-जर्मनीच्या बाजूलाच असलेले एक लहानसे राष्ट्र १९३३ मध्ये हिटलर जर्मनीचा सर्वाधिकारी होताच त्याने सर्व यहुदी लोकांना भयानक वैरी समजून त्यांची शिकार करण्यासाठी आपल्या देशबांधवांना प्रोत्साहन दिले. असंख्य यहुदी लोकांनी देशत्याग करून डेन्मार्कमध्ये आश्रय घेतला.

हिटलरची सुसज्ज सेना १९४० मध्ये अकस्मात् डेन्मार्कमध्ये येऊन थडकली. डेन्मार्कचा राजा व मंत्री यांनी बसून मसलत केली. हिटलरशी युद्ध सुरू केल्यास असंख्य निरपराधी नागरिकांना असह्य कष्ट अनुभवावे लागणार. म्हणून सशस्त्र प्रतिकार करू नये, असा निर्धार त्यांनी केला. जर्मनांनी देश आक्रमून टाकला. राजा राजगृहामध्ये आपल्या शंभर अंग-

रक्षकांसह राहू लागला. थोड्या वेळातच जर्मनांचा हुकूम निघाला. राजाच्या रक्षणार्थ डेन्मार्कच्या अंगरक्षकाऐवजी जर्मन अंगरक्षक ठेवले जातील ! अखिल प्रजेने या परिवर्तनाचा प्रतिरोध केला. राष्ट्रव्यापी हरताळ सुरू झाला. रेल्वे-बस वगैरे सर्व जागच्या जागी थांबल्या. दुकाने, कचेऱ्या सर्व काही बंद झाल्या. पाणीपुरवठा, ग्यास पुरवठा, विद्युत्पुरवठा संपूर्ण बंद झाला. स्त्रिया, मुले श्वासोच्छ्वास निरोधून दूरदूरच्या ओढे, तळी यातून बकेटमधून पाणी आणून घरकाम करू लागली. ती तट्टे मारून एका राजमार्गातच ती सामूहिक स्वयंपाक करू लागली. अखिल राष्ट्रातील यच्चयावत् व्यवहार बंद झाले. तीन दिवसांनंतर जर्मनांनी आपला हुकूम परत घेतला ! पुढे युद्ध संपेपर्यंत राजाला डेन्मार्कांतीलच अंगरक्षक ठेवू दिले. अर्थात् अहिंसात्मक असहकाराचा जय झाला.

त्यानंतर डेन्मार्कमधील यहुदी लोकांनी सदऱ्याच्या बाहीवर पिवळ्या रंगाची पट्टी धारण केली पाहिजे, हिटलरचा असा वटहुकूम निघाला. जर्मनीप्रमाणे डेन्मार्कमध्येही यहुद्यांची शिकार करण्याचा व्यूह आहे, असे डेन्मार्कांतील जनतेला कळून आले. ही आज्ञा पालन करून त्यांच्या दुष्ट उद्देशात सहभागी होण्यास डेन्मार्कचे मन तयार झाले नाही. दुसऱ्या दिवशीच राजापासून रंकापर्यंत सर्वच, डेन्मार्कमधील प्रत्येक नागरिक, पिवळ्या रंगाची बाहीपट्टी धारण करूनच संचार करू लागला !

" यहुदी लोक असोत, किंवा इतर असोत, आपण सर्व एकच. यहुदी लोकांना एकट्यांनाच कष्ट-परंपरेमध्ये ढकलण्यास आम्ही मुळीच तयार नाही. " असा निर्धार या पिवळ्या पट्टीनेच जणू जाहीर केला. जर्मन सैन्य सागराने या छोट्या डेन्मार्कला बाह्यतः चक्काचूर करून टाकणे शक्य होते. परंतु डेन्मार्कचे तेज नाहीसे करणे त्याच्याकडून होऊ शकले नाही. त्यामुळे देश परतंत्र झाला तरी जनता शेवटपर्यंत स्वतंत्रच राहू शकली.

बलशाल्यांच्या अहिंसेचा हा तिसरा मार्ग व्यवहार्य आहे, ही गोष्ट हा इतिहास सांगत आहे. प्रत्येक प्रसंगी हा मार्ग यशस्वी होणारच असे सांगता येणे शक्य नाही ही गोष्ट खरी. त्याचप्रमाणे शस्त्रयुद्धामध्ये जयप्राप्ती होणारच कोणालाही असे सांगता येत नाही. दोन्ही मार्गांत पराजयाचा

संभव आहेच आहे. येशू ख्रिस्ताची अहिंसा अयशस्वी ठरून त्याला सुळावर चढावे आगले हे खरे, तथापि त्या पराजयातच विजयाचे बीज अंतर्भूत होते. गांधीजी हाच सिद्धान्त अनुसरीत होते.

□ □ □

# अण्वस्त्रे आणि अहिंसा

" आता अण्वस्त्रांचा शोध लागलेला आहे; आपले अहिंसा शस्त्र त्याच्या पुढे निरुपयोगी झाले नाही काय ? असा प्रश्न गांधीजींना एका सद्‌गृहस्थाने केला. गांधीजींनी उत्तर केले की, " मुळीच नाही. या अणुयुगात अहिंसेशिवाय बाकीची सर्व शस्त्रे निष्प्रयोजक होत ! अणुबॉंब, हैड्रोजन-बॉंबही विनाश करू शकणार नाहीत असे एकच एक अस्त्र म्हणजे अहिंसा होय."

सन १९४८ जानेवारी दि. ३० ह्या दिवशी महात्माजींच्या खून होण्याच्या काही तास अगोदर अमेरिकेचा एक वातमीदार श्री. मार्गरेट वोरकेव्हायट् याने गांधीजींना विचारले की, " आपण अहिंसेने अणुबॉंबला कसे तोंड द्याल ?"

गांधीजी म्हणाले : " मी भूमिगत होणार नाही. कशाच्याही आड लपून राहणार नाही. मी खुल्या मैदानात येऊन उभा राहणार. अणुबॉंब टाकण्यासाठी आलेल्या विमानचालकाविषयी माझ्या हृदयात थोडीही कटुभावना नाही, असे त्याला स्पष्ट दिसेल असे मी करीन. इतक्या उंचीवरून हा विमानचालक माझे तोंड पाहू शकणार नाही हे मी जाणतो, तथापी त्याचे कोणत्याही तऱ्हेने वाईट होऊ नये ही माझ्या अंतःकरणातील इच्छा, तो असेल तेथे त्याच्या अंतःकरणापर्यंत जाऊन पोचणारच पोचणार. तेव्हा त्याचे डोळे उघडतील."

(' महात्मा गांधी : दी लास्ट फेज ' या ग्रंथातून )

□ □ □

# अहिंसात्मक प्रतिरोध

## सेसिल इ हिनशा यांचे विचार

( सेसिल इ हिनशा हे जगातील प्रमुख शांतिवादी लोकांपैकी एक होत. त्यांनी लिहिले 'नॉनव्हायोलेंट रेझिस्टन्स' अहिंसात्मक प्रतिरोध-नांवाच्या पुस्तकातून हे खालील विचार संकलित केलेले आहेत. )

आम्ही अहिंसा नीती अनुसरली तर आक्रमणकारी आमच्या देशातील लक्षावधी जनतेला क्रूरपणे ठार करील, आणि आमचा देश संपूर्णपणे नाश पावेल, अशी भीती कित्येक लोकांना वाटत असते. परंतु अशा तऱ्हेची भीती बुद्धीला पटण्यासारखी नाही. काही ऐतिहासिक घटनांचे परिशीलन केल्यास ही गोष्ट पटण्यासारखी आहे. याची खात्री पटू शकेल. हिटलर-शाहीमध्ये लक्षावधी यहुदी लोक अत्यंत अमानुषपणे ठार केले गेले आहेत हे खरे, त्याचप्रमाणे रशियाच्या सर्वाधिकाऱ्याने लक्षावधी कुलाकांना ( स्वतः शेती करणाऱ्या श्रीमंत रयतांना ) ठार केले हेही खरे आहे. पण ही यहुदी जनता असो किंवा कुलाक असोत, त्यांनी अहिंसात्मक प्रतिकाराची नीती अंगीकारली नव्हती. परंतु डेन्मार्क आणि नॉर्वे या देशांनी त्यांच्यावर नाझी जर्मनीने सर्वाधिकार स्थापण्याची इच्छा केली असताना अहिंसात्मक प्रतिरोध करण्याचे हाती घेतले. त्यांनी हाती घेतलेला हा अहिंसात्मक प्रतिरोधही अपूर्ण वा असंघटित असला तरी ही दोन्ही राष्ट्रे-नॉर्वे आणि स्वीडन-यांचा नाझी लोकांकडून फारच थोड्या प्रमाणात जनसंहार झाला-त्याचप्रमाणे रशियन कम्युनिस्टांच्या आधीन झालेल्या पूर्वजर्मनीमध्येही, अशा तऱ्हेच्या अहिंसात्मक प्रतिरोधामुळे हत्या फारच कमी प्रमाणात झाली. याचे रहस्य काय ? क्रूरपणे युद्ध करण्यासाठी वैरी चालून आला असला तरी, निःशस्त्र होऊन निर्भीक होऊन आपल्या उच्च ध्येयासाठी आपल्या प्राणांचे बलिदान करण्याकरता पुढे येणाऱ्या लोकांना पाहून त्या वैऱ्याच्या अंतःकरणात विवेक उत्पन्न होणारच नाही-इतका अधःपात मनुष्य स्वभावाचा झालेला नाही. मनुष्याचे अंतःकरण म्हणजे जड यंत्र नव्हे.

क्रूर प्रतिपक्षाला आम्हीही क्रूर उपायांनी प्रतिरोध केला असता त्याचे क्रौर्य अधिक परिपुष्टच होत जाणार. त्याचप्रमाणे क्रूर प्रतिरोध्या-पुढे आम्ही नेभळेपणाने, भित्रेपणाने वर्तन केल्यास त्या प्रतिपक्षाचे क्रूरपण अधिक परिपुष्टच होणार. कारण, भित्र्या मनुष्यामध्ये सूड घेण्याची भावना असतेच असते. तो निरुपाय होऊन शस्त्र खाली ठेवीत असतो. म्हणून प्रतिपक्षाच्या अंतःकरणात त्याच्या या शरणागतीने कोणतेही परि-वर्तन होत नाही. परंतु अहिंसात्मक प्रतिरोधामध्ये प्रतिपक्षाशी आपण प्रेमाने, क्षमाशील वृत्तीने सामना करीत असतो. आपण स्वतः कष्ट भोगीत असतो. प्रतिरोध्याला कष्ट देत नसतो. मग वैऱ्याला आपल्या क्रूर वर्तनाचे समर्थन करण्यास कोणताही आधार मिळत नाही. त्याचे अंतःकरणच त्याला त्याच्या वर्तनाविषयी प्रश्न विचारू लागते.

अहिंसात्मक प्रतिरोधामध्ये, आम्ही केवळ आमच्या शुद्ध आत्मबलावर, नैतिक तेजावर विश्वास ठेवीत असतो. संरक्षणार्थ कोणतेही अस्त्र ठेवीत नसतो. शस्त्रसंनद्ध प्रतिपक्षी आमच्यावर चालून आला, एकसारखे आमच्यावर आक्रमण करीत राहिला तरी आम्ही त्याच्या दुष्टपणापुढे कोणत्याही प्रसंगी वाकणार किंवा नमणार नाही, असा दृढ निर्धार हाती घेत असतो. असे असूनही प्रतिपक्षाविषयी, निर्मल प्रेम, अंतःकरणामध्ये ठेवून, वैऱ्याला तो प्रेमानेच विरोध करीत असतो. अशा प्रकारच्या शुद्ध प्रेमास्त्राला तोंड देऊ शकेल असे कोणतेही भौतिक अस्त्र जगतात नाही. या प्रकारच्या आमच्या प्रेमाक्रमणामुळे प्रतिपक्षामध्ये सुप्त असलेला विवेक आणि मानवता व सच्चारित्र्याचे बीज अंकुरीत होऊ लागते. त्याच्या अंतःकरणात त्याला पूर्वी कधीही न भासलेल्या प्रतिक्रिया उत्पन्न होऊ लागतात.

आणखी एक ध्यानात ठेवण्यासारखा विषय म्हणजे आमची अहिंसा-त्मक नीती यशस्वी व्हावयास पाहिजे असेल तर, आमच्यावर आक्रमण करीत असलेल्या राष्ट्रांतील अखिल जनतेच्या अंतःकरणात परिवर्तन झाले पाहिजे असे नाही. त्या राष्ट्रातील काही अल्पसंख्याकांच्या अंतःकरणामध्ये परिवर्तन झाले तरी पुरे आहे. त्यायोगे त्या राष्ट्रातील ऐक्य भंग पावेल, त्यामुळे त्या राष्ट्राचे धैर्य व निर्धार खच्ची होत जाईल. एवढेच नव्हे, ते

राष्ट्र जसजसे अधिकाधिक क्रूर उपाय हाती घेत जाईल तसतसे त्या राष्ट्राच्या सैन्यामध्येसुद्धा या आमच्या प्रेमाक्रमणामुळे कित्येक सैनिक आपले शस्त्र खाली ठेवून आपल्या सरकाराची आज्ञा उल्लंघन करतील.

आतापर्यंत अहिंसात्मक प्रतिरोधाचा राष्ट्ररक्षणार्थ एक नीती या दृष्टीने आम्ही विचार केला; परंतु अहिंसेला विश्वप्रेमाला ‘ हीच योग्य व खरी जीवननिष्ठा ’ म्हणून स्वीकारू तेव्हाच त्याचे परिपूर्ण फल विकसित होणार आहे. केवळ एक नीती म्हणजे धोरण म्हणून स्वीकारल्यास, त्याचे फल फारच मर्यादित असणार. नाझी जर्मनीने आपल्यावर अधिकार स्थापन करताच, नॉर्वे आणि स्वीडन या देशांनी आपल्या मजूर संघटनांच्या द्वारा हाती घेतलेला संप, हरताळ, त्याचप्रमाणे इतर विविध अहिंसात्मक प्रतिरोधाच्या योजना, केवळ एक तात्पुरती रक्षणाची नीती म्हणून हाती घेतल्यासारखे होते. परंतु या प्रकारच्या योजनांचे मूल्य फारच कमी असते. त्यामध्ये गंडांतरे नसतात असे नाही.

अहिंसात्मक प्रतिरोधाचा प्रयोग करणाऱ्यांच्या अंतःकरणामध्ये आक्रमणकाऱ्याविषयी खरोखरीच प्रेम, सद्भावना असली पाहिजे. ती असल्याशिवाय अहिंसेचे महत्त्वपूर्ण परिणाम फलित होणार नाहीत. पुरातन ख्रिस्त मताच्या लोकांनी क्रूर रोमन साम्राज्यावरही आपल्या आत्मबलाने विजय संपादन केला. त्यातील गूढ कोणते ? कारण, भगवान् येशू ख्रिस्ताचा परमावधीचा क्षमागुण त्यांच्यांत होता. आपल्याला अमानुष रीतीने ठार करणाऱ्याविषयी “ हे देवा, या लोकांना क्षमा कर. कारण, त्यांना आपण काय करीत आहो हे समजतच नाही. ” अशी अंतःकरणपूर्वक प्रार्थना करीत, धर्मासाठी आपली प्राणाहुती त्यांनी दिली.

यासाठी राष्ट्रातील सर्व लोक संत, महात्मा झाले पाहिजेत असा याचा अर्थ नाही. अथवा राष्ट्रातील बहुसंख्य लोक साधु-महात्मा झाले पाहिजेत असेही नाही. खरे असे आहे की राष्ट्रातील काही आत्मसमर्पण केलेले लोक, सर्व स्वार्थ बाजूला ठेवलेले काही लोक, अखिल राष्ट्राचा भार, जबाबदारी पुष्कळ मर्यादेपर्यंत वहात असतात. असेच लोक राष्ट्राचे खरे नेते असतात. आणि दुःख सहन करण्याचा भार अपरिहार्यपणे या नेत्यांच्या वाट्यालाच येत असतो. असे नेतेच अखिल राष्ट्राचा नैतिक स्तर उन्नत करीत असतात.

याचा परिणाम म्हणून सामान्य जनतेमध्येसुद्धा पुरेसे परिवर्तन होत असते. आत्मसमर्पण केलेल्या काही थोड्याच नेत्यांच्या या नैतिक प्रभेने संपूर्ण समाजाची स्वार्थलोलुपता कमी कमी होत जाते, त्यांच्यामध्येही शुद्ध प्रेमभाव विकासित होत जाण्यास प्रारंभ होतो. त्यांचे विचार सात्त्विक होत जातात. याप्रकारे आत्मसमर्पण केलेल्या काही थोड्या नेत्यांमुळेच अखिल राष्ट्राच्या सामान्य जनतेची नैतिक पातळी उन्नत होताच राष्ट्राच्या इतिहासात नूतन अध्याय लिहिला जातो, नवा इतिहास निर्माण होतो.

तथापी या अहिंसात्मक प्रतिरोधामध्ये नेतृत्वाची जबाबदारी स्वीकारणे मात्र अंतिम परीक्षाकाळीही अहिंसा निष्ठेने पालन करणारे असले पाहिजेत. जे आपल्या ध्येयासाठी आत्मबलिदान करण्यास सदा सिद्ध असतात त्यांच्याकडूनच राष्ट्राचे नवनिर्माण होणे शक्य आहे. मानव इतिहासाचा नवा अध्याय त्यांच्याकडूनच लिहिला जाऊ शकेल. अर्ध्या-मुर्ध्या कच्च्या मनाचा येथे काहीही उपयोग नाही. सर्व इतिहासप्रसिद्ध धार्मिक नेते आपण निवडलेल्या काही थोड्या निवडक शिष्यांपुढे अशा निष्ठेचा आदर्श ठेवीत असतात.

"हे कार्य परमात्म्याचे आहे. हे सर्व परमात्माच करीत आहे, आम्ही केवळ निमित्तमात्र आहोत. बासरी वाजविणारा तो परमात्माच आहे. आम्ही त्याच्या हातातील बासरीप्रमाणे आहो." अशा प्रकारच्या श्रद्धा भावनेने त्याच्या चरणावर सर्वस्व समर्पित करण्याची श्रद्धा मानवामध्ये उमटताच मानव महत्तर त्यागाला सिद्ध होत असतो. भौतिक आश्रय, भौतिक आधार यांचा त्याग करीत असतो. कीर्तीचा मोह, आप्तस्वजनांचा मोह त्याचे मन विचलीत करू शकत नाही.

हिंसामार्गाचा विचारपूर्वक त्याग करून अहिंसानिष्ठा अनुसरणाऱ्यामध्ये एक प्रकारची … अहिंसा अंगीकृत केल्याने त्याच्यामध्ये पूर्ं … ऊ लागते."

REFBK-0014482

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.